❖ संस्थापक : कै. वसंत काणे ❖ नोंदणी क्रमांक : १६६३/१९५७ ❖ पुणे आवृत्ती | बुधवार, दि. ०९ सप्टेंबर २०२६ | ❖ पाने : ८ ❖ अंक : २५५ ❖ Gmail : news.sandhya@gmail.com ❖ किंमत : ७ रूपये

www.dainikesandhya.com Epaper - www.sandhyaepaper.com www.youtube.com/@sandhyalivenews

७० वर्ष
निर्भीड पत्रकारीतेची

दैनिक
# संध्या
नि:पक्ष समीक्षणाचे....निर्भीड दैनिक

क्युआर स्कॅन करून
दै. संध्याच्या
यूट्युब चॅनलला सबस्क्राईब करा
SUBSCRIBE
www.sandhyaepaper.com

### मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत सुखजीत स्टार्च अँड केमिकल्स समवेत

# ‘मेगा प्रोजेक्ट’ उभारणीसाठी सामंजस्य करार



### येवला औद्योगिक क्षेत्रात ₹७६० कोटींची गुंतवणूक; ३,२०० रोजगारांच्या निर्मितीला चालना

■ मुंबई (दै. संध्या)

येवला औद्योगिक क्षेत्रात ७६० रुपये कोटी गुंतवणूकीच्या माध्यमातून ३,२०० रोजगारांच्या निर्मितीला चालना देण्यात येत आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत उद्योग विभाग आणि सुखजीत स्टार्च अँड केमिकल्स यांच्यामध्ये ‘मेगा प्रोजेक्ट’उभारणीसाठी सामंजस्य करार करण्यात आला. सह्याद्री अतिथिगृह येथे झालेल्या कार्यक्रमात सुखजीत स्टार्च अँड केमिकल्सच्या सामंजस्य कराराचे हस्तांतरण झाले. यावेळी अन्न व नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ, उद्योग मंत्री उदय सामंत, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाचे मुख्य कार्यकारी अधिकारी दिपेंद्रसिंह कुशवाह, माजी खासदार समीर भुजबळ, सुखजीत स्टार्च अँड केमिकल्सचे भावदीप सरडाना उपस्थित होते. नाशिक जिल्ह्यातील येवला औद्योगिक क्षेत्रात मका प्रक्रिया व त्यापासून विविध मूल्यवर्धित उत्पादने निर्मिती करणाऱ्या मे. द सुखजीत स्टार्च अँड केमिकल्स लिमिटेडच्या प्रस्तावित प्रकल्पाला ‘मेगा प्रोजेक्ट’चा दर्जा आहे. या प्रकल्पासाठी कंपनीकडून ₹७६० कोटींची गुंतवणूक प्रस्तावित असून, त्यातून सुमारे ३,२०० व्यक्तींना रोजगाराच्या संधी उपलब्ध होणार आहेत. यामध्ये सुमारे २०० थेट आणि ३,००० अप्रत्यक्ष रोजगारांचा समावेश आहे. कंपनीने येवला औद्योगिक क्षेत्र, तालुका येवला, जिल्हा नाशिक येथे मका स्टार्च, डेक्स्ट्रोज अँनहायड्रस, डेक्स्ट्रोज मोनोहायड्रेट, सॉर्बिटॉल ७० टक्के सोल्युशन, ग्लुकोज सिरप, माल्टोज सिरप, मका ग्लुटेन, मका जर्म, मका तेल, मका ब्रॅन/कॅटल फीड तसेच मका ऑइल केक आदी उत्पादनांच्या निर्मितीची क्षमता आहे. या प्रकल्पामुळे नाशिक जिल्ह्यातील मका उत्पादक शेतकऱ्यांना बाजारपेठ उपलब्ध होण्याबरोबरच मका प्रक्रियेला आणि मूल्यवर्धनाला चालना मिळण्याची अपेक्षा आहे. येवला परिसरातील औद्योगिक विकास, स्थानिक रोजगारनिर्मिती आणि कृषीआधारित उद्योगांना चालना देण्याच्या दृष्टीने हा प्रकल्प महत्वपूर्ण ठरणार आहे.

## आशाजींची गाणी कित्येक पिढ्यांना आनंद देत राहतील : मुख्यमंत्री फडणवीस




■ मुंबई (दै. संध्या)

ज्येष्ठ गायिका आशा भोसले म्हणजे सळसळते चैतन्य होत्या. वयाच्या नव्वदीतही सादरीकरण करताना त्यांच्यातील ऊर्जा आणि जीवनाविषयीचे प्रेम प्रकर्षाने जाणवत असे. त्यांचा आवाज आणि त्यांची गाणी यापुढेही कित्येक पिढ्यांना आनंद देत राहतील, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले. आशा भोसले यांच्या ९३ व्या जन्मदिनानिमित्त संगीतकार ए. आर. रहमान यांनी तयार केलेल्या ‘आशा फॉरएव्हर’ या गीताचे लोकार्पण मुख्यमंत्री फडणवीस यांच्या हस्ते मुंबईत झाले. यावेळी सांस्कृतिक कार्यमंत्री अ‍ॅड. आशिष शेलार, संगीतकार ए. आर. रहमान, आशा भोसले यांची नात जनाई भोसले, भोसले कुटुंबीय, तसेच चित्रपट, संगीत क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, आशाजींचे संपूर्ण आयुष्य हे आनंद, उत्साह आणि चैतन्याने भरलेले होते. ज्यांनी आपल्या स्वरांनी अनेक दशकांपासून रसिकांना आनंद दिला, त्यांच्या आठवणी आणि समृद्ध सांगीतिक वारसा जतन करणे ही आपली जबाबदारी आहे. त्याच भावनेतून तयार करण्यात आलेले ‘आशा फॉरएव्हर’ हे गीत त्यांना दिलेली सुंदर स्वरांजली आहे. “आशाजींचा आवाज ही कधीही न संपणारी अनुभूती आहे. जोपर्यंत त्यांची गाणी ऐकली जातील, तोपर्यंत त्या रसिकांच्या मनात कायम राहतील. त्यांच्या आठवणी जपण्यासाठी अशा उपक्रमांचे आयोजन दरवर्षी व्हावे,” अशी अपेक्षा मुख्यमंत्री फडणवीस यांनी व्यक्त केली. त्यांनी संगीतकार ए. आर. रहमान, सांस्कृतिक कार्यमंत्री अ‍ॅड. शेलार आणि गीतनिर्मितीशी संबंधित संपूर्ण चमूचे अभिनंदन केले. सांस्कृतिक कार्यमंत्री अ‍ॅड. आशिष शेलार म्हणाले की, आशा भोसले यांचे महाराष्ट्रातील प्रत्येक मराठी माणसाशी तसेच देश-विदेशातील संगीतप्रेमींशी अतूट नाते होते. त्यांनी मराठीसह विविध भारतीय आणि आंतरराष्ट्रीय भाषांमध्ये गाणी गायली. त्यांच्या स्वरांनी भारतीय संगीताला जागतिक स्तरावर स्वतंत्र ओळख मिळवून दिली.

## थोडक्यात...

### नोकर भरतीसाठी सुधारित आरक्षण धोरण

मुंबई : दैनिक संध्या

प्राविण्यप्राप्त खेळाडूंना शासकीय सेवेत नोकरीची संधी देण्यासाठी असलेल्या पाच टक्के आरक्षणाला आता एकसंध धोरणाची जोड मिळणार आहे. विविध शासन निर्णयांमधील तरतुदींमध्ये सुसूत्रता आणत खेळाडू आरक्षणाचे सुधारित धोरण लागू करण्यास राज्य मंत्रिमंडळाने मंगळवारी मंजुरी दिली. यापुढे आरक्षणाचा लाभ घेणाऱ्या खेळाडूंच्या क्रीडा प्रमाणपत्राची वैधता तपासणी करणे बंधनकारक करण्यात आले असून, यापूर्वीच्या निर्णयांनुसार पात्र ठरणाऱ्या उमेदवारांनाही नव्या शासन निर्णयाच्या तारखेपासून तीन महिन्यांत प्रमाणपत्र पडताळणी करून घ्यावी लागणार आहे. शासकीय, निमशासकीय आणि शासनाकडून निधी अथवा अनुदान मिळणाऱ्या विविध संस्थांमधील गट-अ, ब, क आणि ड संवर्गातील सरळसेवेच्या पदांसाठी हे पाच टक्के समांतर आरक्षण लागू राहणार आहे. मंत्रालयीन विभाग व त्यांच्या अधिपत्याखालील कार्यालये, जिल्हा परिषद, पंचायत समित्या, ग्रामपंचायती, महानगरपालिका, शासकीय उपक्रम, मंडळे, महामंडळे, विद्यापीठे, अनुदानित शैक्षणिक संस्था, आश्रमशाळा, सहकारी संस्था आणि शासनमान्य स्वयंसेवी संस्थांचाही त्यात समावेश आहे.

### महालक्ष्मी जगदंबा संस्थानला शासकीय जमीन

मुंबई : दैनिक संध्या

कोराडी येथील श्री महालक्ष्मी जगदंबा संस्थानच्या ताब्यात असलेल्या तीर्थक्षेत्र विकास आराखड्यातील शासकीय जमिनी ३० वर्षांसाठी नाममात्र दराने भाडेतत्त्वावर देण्यास मंगळवारी राज्य मंत्रिमंडळाने मान्यता दिली. या जमिनीवर तीर्थक्षेत्र विकास आराखड्यानुसार विविध बांधकामे करण्यात आली असून, त्यांचे व्यवस्थापन संस्थानकडून केले जाते. भाविकांसाठी सुविधा, स्वच्छता, वीज, पाणी आणि सुरक्षेवरील खर्च संस्थानला करावा लागत असल्याने व्यवस्थापन अधिक प्रभावी करण्यासाठी जमिनीचा भाडेपट्टा देण्याची संस्थानची मागणी होती. शासकीय मालकीची जमीन असल्याने त्यावरील देखभाल आणि इतर खर्च संस्थेच्या ताळेबंदात दाखविण्यात अडचणी येत होत्या. त्यामुळे नियोजनबद्ध व्यवस्थापन आणि देखभाल-दुरुस्तीसाठी ३० वर्षांचा भाडेपट्टा देण्याची मागणी करण्यात आली होती. शासनाच्या प्रचलित वार्षिक भाडेपट्टा आकारणीच्या तत्त्वानुसार ही जमीन देण्यास मंजुरी देण्यात आली. दरम्यान, मुंबईतील भुलेश्वर येथील कैवल्यधाम ईश्वरदास चुन्नीलाल योगिक सेंटरच्या भाडेपट्ट्याचे पुढील ३० वर्षांसाठी सवलतीच्या दराने नूतनीकरण करण्यासही मंत्रिमंडळाने मान्यता दिली. आरोग्यविषयक क्षेत्रात कार्यरत असलेल्या या संस्थेमार्फत योग, प्राणायाम, निसर्गोपचार आणि आयुर्वेदाचे शिक्षण, प्रशिक्षण तसेच उपचार दिले जातात.

## तुझ्या सात पिढ्या राजकारणात असल्या तरी उखडून टाकू : मनोज जरांगे

■ मुंबई (दै. संध्या)



मराठा आरक्षणासंदर्भात राज्य सरकारने जे निर्णय घ्यायचे होते, ते घेतले आहेत. मनोज जरांगे पाटील यांच्या भेटीसाठी आता अंतरवालीला राज्य सरकारचे कोणतेही शिष्टमंडळ जाणार नाही. मनोज जरांगे उपोषणावर ठाम असतील तर तो त्यांचा निर्णय आहे, असे वक्तव्य मराठा आरक्षण उपसमितीचे अध्यक्ष राधाकृष्ण विखे-पाटील यांनी केले होते. यावर मनोज जरांगे यांनी संताप व्यक्त केला आहे. विखे-पाटील मराठ्यांचे वाटोळे करत आहे. फक्त फडणवीसचे गुणगान गायचे आणि शरद पवारने काहीच दिले नाही एवढेच तुणतुणे यांनी वर्षभर वाजवले. मराठ्यांना मोठं करण्याचा विडा घेतला तर अपमान पचवायची ताकद ठेवा. तुम्ही वर्षभर मराठ्यांना कशाला नाचवले? असा सवाल मनोज जरांगे यांनी विचारला. ते मंगळवारी अंतरवाली सराटी येथे प्रसारमाध्यमांशी बोलत होते. तुम्ही सपशेल अपयशी ठरलात. मराठ्यांना तुम्ही दगा फटका दिला, तुमच्यामुळे मराठ्यांचे वाटोळे झाले. तू अंतरवालीमध्ये ये किंवा नको येऊ तुला बोलवत नाहीत. सरकारला समजून घ्यायला सरकार बाप आहे का? देवेंद्र फडणवीस हा आजवरचा सगळ्यात निष्क्रिय मुख्यमंत्री आहे, अशी टीका मनोज जरांगे यांनी केली. तुमचे ठरले आहे मराठ्यांच्या रॅलीवर हल्ला करायचा. याला पाऊल म्हणतात का, आम्ही कधीच अंतरवालीमध्ये जाणार नाही. तुम्ही मराठ्यांना कलंक आहात.

तुम्हाला अंतरावलीमध्ये कोण ये म्हणते. ते येणार म्हटले आता येत नसतील तर नको येऊ. तुझ्या सात पिढ्या राजकारणात असल्या तरी मी जरांगे आहे, उखडून टाकू, अशी घणाघाती टीका जरांगे पाटील यांनी केली. नगर जिल्ह्यातील खूप नेत्यांनी मला सांगितले होते की, विखे-पाटील दगाबाज आहेत. विखे सारखे उपसमितीचे अध्यक्ष असले तर मराठ्यांचे वाटोळेच होणार. विखेंना यापासून पळ काढता येणार नाही. देवेंद्र फडणवीस मराठा आरक्षण देत नाही. ते काही करत नाहीत फक्त दिखावा आहे. मला जेलमध्ये टाकायचे तर टाका. 12 तारखेला बैठक होणार हे आमचे ठरले आहे, असेही जरांगे पाटील यांनी सांगितले.

## एकेरी भाषेबद्दल बोलणाऱ्या भरत गोगावलेंनाही इशारा

### जरांगे पाटील संतापले, म्हणाले, १५ पैकी एकही मागणी मान्य नाही

■ मुंबई (दै. संध्या)



मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांच्या उपोषणाचा आज 11 वा दिवस असून सरकारसोबत त्यांच्या मागण्यांची बोलणी सुरुच आहेत. एकीकडे सरकारकडून बैठका घेत मागण्या मान्य केल्याचं सांगितलं जात आहे. तर, दुसरीकडे मागण्या मान्य न झाल्याने मनोज जरांगे पाटील उपोषणावर ठाम आहेत. त्यातच, सरकारने मनोज जरांगे यांच्या 12 मागण्या मान्य केल्याचं मंत्री उदय सामंत यांनी म्हटलं. मात्र, सरकारने काहीही मान्य केलं नसल्याचं जरांगे पाटील यांनी म्हटलं आहे. तसेच, सरकारमधील विविध मंत्र्यांकडून होत असलेल्या टीकेलाही त्यांनी उत्तर दिलंय. तसेच, मंत्री भरत गोगावलेंनाही इशारा दिलाय.

मनोज जरांगेंनी मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदेंबद्दल एकेरी भाषेत बोलू नये, असे उदय सामंत यांनी म्हटले होते. त्यावर, जरांगे पाटील यांनी भूमिका मांडली. चुकीच्याला चुकीचं म्हणू नको काय? तुम्ही आम्हाला दलाल म्हणून बोलायला ठेवलं आहे का? तुमच्या मनगटात फक्त पैशाची ताकद आहे. शिंदेंनी चूक केली ती कबूल करा. एकनाथ शिंदेंना बोललो त्याचं वाईट वाटलं पण त्यांनी शिरसाठ्याचं ऐकून आमचे प्रमाणपत्र रद्द का केले? असा सवाल जरांगे पाटील यांनी उदय सामंत यांना विचारला. तर, राधाकृष्ण विखेंचं सोडून काहीही विचारा. मराठ्यांना याने अर्धवट फासावर सोडून दिलं. हा फक्त आंदोलन कसं मोडलं पाहिजे यांचं बघतो. फडणवीस, शिंदे यांच्या सांगण्यावरून तुम्ही आमच्यावर हल्ला करता का? असा सवालही जरांगे पाटील यांनी विचारला.

15 पैकी 12 मागण्या मान्य, याला न्याय देणं म्हणत नाहीत. खाली ते मान्य केलं जातं नाही, तुम्ही गरीबांचं वाटोळं केलं. तुम्ही मराठा समाजाला पश्चाताप करण्याच्या उंबरठ्यावर आणलं. तुम्हाला माहित नाही, मराठा समाज बाप आहे. समाजाला माहीत आहे, तुम्ही समाजाची पिळवणूक केली. तुम्ही शिष्टमंडळ म्हणून वेगळं बोलता, गाडीत बसल्यानंतर वेगळं बोलता, हॉटेलमध्ये असल्यानंतर वेगळं बोलता. तुम्ही काहीही मान्य केलं नाही, 15 पैकी एकही मागणी मान्य झालेली नाही, असे म्हणत सरकारने कुठलीही मागणी मान्य केली नसल्याचं जरांगे पाटील यांनी म्हटलं आहे.


नाशिकमध्ये मराठा क्रांती मोर्चाने घेतलेल्या बैठकीबाबतही जरांगे पाटील यांनी भूमिका मांडली. चांगलं आहे, मला त्यांच्याबद्दल बोलायचं नाही. ते माझ्याबद्दल बोलल्यानंतर बघू. विखे पाटलांचा यांना आसरा असू शकतो. समाजाचा कुठे प्रस्ताव असू शकतो का? हे लोक माझ्या विरोधात बोलले नाही त्यामुळे मी पण त्यांना बोललो नाही, असे म्हणत राधाकृष्ण विखे पाटलांची त्यांना साथ असल्याची शंका जरांगे पाटील यांनी व्यक्त केलीय.

दरम्यान, एकेरी भाषेचा उल्लेख केल्यास जशास तसे उत्तर देऊ, असे मंत्री भरत गोगवलेंनी म्हटले होते. त्यावर, मी तयार आहे, कधीही सज्ज आहे, माझ्या नादाला लागायचं नाही. माझ्याकडे पुरावा आहेत. मीडियात पुरावा देईन, मी शिंदेंवर बोलणार आहे. तुम्ही मराठ्यांचे संसार उध्वस्त करणाऱ्यांच्या बाजूने बोलू नका. मग, तुमच्यापेक्षा तटकरे बरा म्हणावं लागेल, होऊ दे काय व्हायचं ते, अशा शब्दात जरांगे पाटलांनी भरत गोगावलेंवर पटलवार केला.

# दहीहंडीत गौतमी पाटील, राधा पाटील यांना नाचवले

### *संभाजी भिडे संतापले; म्हणाले संपूर्ण देशाने या सणांमध्ये डॉल्बी वाजतात ते फेकून दिले पाहिजे*

■ मुंबई (दै. संध्या)



सोशल मीडियावर काही दहीहंडी कार्यक्रमांमधील अश्लील हावभाव आणि नृत्यांवर नागरिकांनी आणि विचारवंतांनी टीका केली आहे. सणांची धार्मिक आणि पारंपरिक पवित्रता जपली पाहिजे, अशी मागणी होत आहे. अनेक दहीहंडी उत्सवांत अभिनेत्रींच्या नृत्याचे कार्यक्रम झाले, ज्यावर संमिश्र प्रतिक्रिया उमटल्या. दहीहंडी उत्सवात डीजे, डॉल्बी आणि महिलांच्या नृत्यांवर (डान्स) मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी कडक आक्षेप घेत हा प्रकार महाराष्ट्राच्या संस्कृतीविरोधी असल्याचे म्हटले. आता शिव प्रतिष्ठानचे संस्थापक संभाजी भिडे यांनी देखील हिंदू सणांमध्ये वाजवणाऱ्या डॉल्बीवर आक्षेप घेतला आहे.

हिंदू सणांमध्ये डॉल्बी वाजले नाही पाहिजे. संपूर्ण देशाने या सणांमध्ये डॉल्बी वाजतात ते फेकून दिले पाहिजे, असे रोखठोक मत शिव प्रतिष्ठानचे संस्थापक संभाजी भिडे यांनी व्यक्त केलं. डॉल्बी वाजवून त्यातून काय मिळतं?, असा सवालही संभाजी भिडे यांनी उपस्थित केला. दरम्यान, दहीहंडीच्या कार्यक्रमात नृत्यांगना गौतमी पाटील, राधा पाटील यांच्यासह अनेक महिला नाचताना दिसल्या. यावर देखील संभाजी भिडेंनी आक्रमक प्रतिक्रिया दिली आहे. हिंदू सणांमध्ये महिला नाचवणे योग्य नाही. ज्यांनी दहीहंडी या हिंदूंच्या कार्यक्रमात डान्सर नाचवल्या, ते सगळे देशद्रोही आहेत, अशी टीकाही संभाजी भिडे यांनी केली. डीजे, डॉल्बी ही उत्तरेतील संस्कृती महाराष्ट्रात आणतोय का? गोविंदाच्यावेळी काही महिलांना व्यासपीठावर आणून नाचवलं जातं, हे सगळं युपी, बिहारमध्ये चालतं, आपण त्यांना शिकवायचं की आपण त्यांची संस्कृती इकडे आणायची. सण कसे साजरे व्हावेत, याचं प्रोटोकॉल असले पाहिजे, आपण आपल्या संस्कृतीप्रमाणे ही गोष्ट केली पाहिजे. लेझर लाईट मारतात, त्याने डोळे गेले, हार्टचा त्रास असणारी माणसं डॉल्बीच्या आवाजाने मरु शकतात. कुठे नेतोय आपण सण, टिळकांनी कशासाठी सुरु केला सण, आपण कुठे नेऊन ठेवलाय तो. तुम्ही धर्मात बेभान होऊ नये. उत्सव हा ठीक आहे, पण धर्मांधपणा वाईट आहे, तो खड्ड्यातच घेऊन जाणार, अशी परखड भूमिका राज ठाकरे यांनी मांडली. महाराष्ट्रात गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर डीजे, डॉल्बी आणि हाय-पॉवर साऊंड सिस्टीमच्या वापरावरून मोठा सामाजिक, कायदेशीर आणि राजकीय वाद सुरू झाला आहे. एका बाजूला ध्वनीप्रदूषण आणि आरोग्याचा प्रश्न उपस्थित केला जात आहे, तर दुसऱ्या बाजूला काही उत्सव आयोजक आणि राजकीय नेते सण-उत्सवातील संगीतावर निर्बंध घालण्यास विरोध करत आहेत. पुण्यात ध्वनीप्रदूषणाविरोधात भूमिका घेणारे कार्यकर्ते विद्यानंद बापट यांनी सण-उत्सवांमध्ये होणाऱ्या कर्णकर्कश आवाजाचा मुद्दा लावून धरला. या पार्श्वभूमीवर त्यांच्यावर झालेल्या कथित हल्ल्यामुळे डीजेच्या मुद्द्याला राज्यव्यापी राजकीय आणि सामाजिक स्वरूप मिळाले. पोलिसांनी या प्रकरणाची दखल घेतली असून हल्ल्याच्या घटनेमुळे वाद आणखी तीव्र झाला आहे. राज्यातील काही शहर आणि जिल्ह्यांनी उत्सवांच्या काळात डीजे, डॉल्बी किंवा हाय-डेसीबल साऊंड सिस्टीमवर कडक निर्बंध अथवा बंदीचे आदेश जारी केले आहेत. नागपूर, परभणी, लातूर, नांदेड आणि इतर काही ठिकाणी प्रशासनाने स्थानिक परिस्थितीनुसार कठोर भूमिका घेतली आहे. मात्र, हे आदेश सर्व महाराष्ट्रासाठी एकसारखे लागू असलेली एकच राज्यव्यापी बंदी नसून अनेक ठिकाणी स्थानिक प्रशासन व पोलिसांच्या आदेशांनुसार निर्बंध लागू करण्यात आले आहेत. डीजे आणि डॉल्बीविरोधकांचा मुख्य मुद्दा म्हणजे अतिप्रचंड आवाज आणि त्यातून होणारे ध्वनीप्रदूषण. नागरिक, रुग्ण, वृद्ध, लहान मुले आणि गर्भवती महिलांना मोठ्या आवाजाचा त्रास होतो, असे सांगितले जात आहे. वाहतूक कोंडी, रुग्णवाहिकांना होणारा अडथळा आणि सार्वजनिक शांततेचा प्रश्नही पुढे आला आहे.

## ‘आप’चा आयोगावर गंभीर आरोप

■ मुंबई (दै. संध्या)

दिल्लीच्या राजकारणात सध्या निवडणूक आयोगाच्या मतदार याद्यांवरून आणि विशेष संक्षिप्त पुनरीक्षण प्रक्रियेवरून मोठा वाद पेटला आहे. आम आदमी पार्टीचे दिल्ली प्रदेशाध्यक्ष आणि माजी मंत्री सौरभ भारद्वाज यांनी पत्रकार परिषद घेऊन निवडणूक आयोगाच्या कामकाजावर गंभीर प्रश्न उपस्थित केले आहेत. 'आप' सोडून भाजपमध्ये गेलेले खासदार राघव चड्ढा यांचे नाव दिल्लीच्या मतदार यादीत अचानक कसे समाविष्ट झाले, असा थेट सवाल करत सौरभ भारद्वाज यांनी निवडणूक आयोगाच्या कथित गैरकारभाराचा पर्दाफाश केल्याचा दावा केला आहे. पत्रकार परिषदेत बोलताना सौरभ भारद्वाज म्हणाले, "निवडणूक आयोगाच्या कामाकाजात पारदर्शकता उरलेली नाही. भाजपवाले पुरावे मागतात, म्हणूनच आज आम्ही पुराव्यानिशी हा प्रकार समोर आणत आहोत. आप सोडून भाजपमध्ये गेलेले माजी खासदार राघव चड्ढा यांनी 3 सप्टेंबर रोजी पत्रकार परिषद घेऊन पंजाबमध्ये आपले नाव मतदार यादीतून वगळले गेल्याचे सांगितले होते. ते पंजाबचे नागरिक असल्याचे सांगत पुन्हा तिथे नाव नोंदवणार असल्याचे म्हणाले होते. मात्र, 31 ऑगस्ट रोजी प्रसिद्ध झालेल्या दिल्लीच्या मसुदा मतदार यादीत वेगळाच प्रकार समोर आला आहे." सौरभ भारद्वाज यांनी राघव चड्ढा यांच्या न्यू राजेंद्र नगर येथील जुन्या कौटुंबिक पत्त्याचा हवाला देत तांत्रिक प्रश्न उपस्थित केले. राघव चड्ढा जिथे राहत होते, त्या राजेंद्र नगर डबल स्टोरी बिल्डिंगमधील बूथवर एकूण 746 नोंदणीकृत मतदार होते.



# ‘श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ’ : दहीहंडीचा उत्सव उत्साहात साजरा

■ सासवड (दै. संध्या)

श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ संचलित शिवाजी इंग्लिश मिडीयम स्कूल अँड ज्युनिअर कॉलेज, सासवड येथे श्रीकृष्ण जन्माष्टमीनिमित्त दहीहंडी उत्सव मोठ्या उत्साहात व आनंदमय वातावरणात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमात इयत्ता पहिली ते चौथीच्या विद्यार्थ्यांनी दहीहंडीच्या विविध गाण्यांवर उत्कृष्ट नृत्य सादर करून कार्यक्रमाची रंगत वाढवली. विद्यार्थ्यांच्या सुंदर नृत्य सादरीकरणासाठी सौ. ताई माळवे मॅडम व सौ. अश्विनी सुतार मॅडम यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. कार्यक्रमाचे उत्कृष्ट नियोजन सांस्कृतिक विभागाच्या सदस्या सुप्रिया खळदकर मॅडम यांनी केले. कार्यक्रमाचे प्रभावी सूत्रसंचालन सुनिता नवले मॅडम यांनी केले.

सौ. सुषमा वढणे मॅडम यांनी गोकुळाष्टमीचे महत्त्व व श्रीकृष्णाच्या बाललीलांची माहिती विद्यार्थ्यांना दिली. त्यांच्या मार्गदर्शनातून विद्यार्थ्यांना भारतीय संस्कृती आणि परंपरांचे महत्त्व समजले.

यावेळी शिवाजी इंग्लिश मिडीयम स्कूलच्या प्राचार्या व समन्वयक आदरणीय रेणुका सिंग मर्चंट मॅडम तसेच उपप्राचार्या सौ. सुषमा रासकर मॅडम यांनी सुरेल भजन सादर करून कार्यक्रमात भक्तिमय वातावरण निर्माण केले. त्यांच्या सुंदर गायनाला उपस्थितांनी उत्स्फूर्त दाद दिली.

विद्यार्थ्यांनी श्रीकृष्ण व गोपिकांच्या वेशभूषेत सहभागी होत कार्यक्रमाची शोभा वाढवली. दहीहंडीच्या उत्साहपूर्ण वातावरणात विद्यार्थ्यांनी “गोविंदा आला रे आला!” अशा जयघोषात आनंद साजरा केला. या उत्सवातून विद्यार्थ्यांना एकता, सहकार्य, संघभावना तसेच भारतीय संस्कृती व परंपरांचे महत्त्व समजले. संपूर्ण कार्यक्रम उत्साहपूर्ण, आनंदमय आणि भक्तिमय वातावरणात यशस्वीरीत्या पार पडला.

## थोडक्यात पण महत्वाचे



### सकल मराठा समाजाच्या मागण्यांसाठी मुख्यमंत्री फडणवीसांना निवेदन

**बारामती : दैनिक संध्या**

सकल मराठा समाजाच्या विविध प्रलंबित मागण्यांकडे शासनाचे लक्ष वेधण्यासाठी मराठा क्रांती मोर्चा, बारामतीच्या वतीने आज महाराष्ट्राचे मुख्यमंत्री मा. देवेंद्र फडणवीस यांच्या नावाने बारामती प्रशासकीय भवन येथे निवेदन देण्यात आले. हे निवेदन प्रांताधिकारी उत्तम दिघे यांच्याकडे सुपूर्द करण्यात आले. यावेळी देण्यात आलेल्या निवेदनाची प्रत महाराष्ट्राचे दोन्ही उपमुख्यमंत्री मा. एकनाथ शिंदे व श्रीमती सुनेत्रा अजितदादा पवार यांनाही देण्यात आली असून, सकल मराठा समाजाच्या मागण्यांबाबत शासनाने तातडीने सकारात्मक निर्णय घ्यावा, अशी मागणी करण्यात आली. मराठा समाजाच्या आरक्षणासह विविध प्रलंबित मागण्यांबाबत शासनाने सकारात्मक व तातडीने निर्णय घ्यावा, अशी भूमिका निवेदनाद्वारे मांडण्यात आली. तसेच अंतरवाली सराटी, जिल्हा जालना येथे मनोजदादा जरांगे पाटील यांच्या नेतृत्वाखाली सुरू असलेल्या आंदोलनाला पाठिंबा व्यक्त करण्यात आला. त्यांच्या मागण्यांचा सहानुभूतीपूर्वक विचार करून त्या तातडीने मान्य कराव्यात, अशी मागणीही करण्यात आली. “मराठा समाजाच्या मागण्यांवर शासनाने तातडीने सकारात्मक निर्णय न घेतल्यास बारामतीतून तीव्र स्वरूपाचे आंदोलन उभारण्यात येईल,” असा इशाराही यावेळी देण्यात आला. यावेळी मराठा क्रांती मोर्चाचे पदाधिकारी व सदस्य तसेच सकल मराठा समाजातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### अटकावून ठेवलेल्या ४४ वाहनांचा १६ सप्टेंबर रोजी ई-लिलाव

**बारामती : दैनिक संध्या**

मोटार वाहन कर न भरल्यामुळे तसेच मोटार वाहन कायदा व त्याअंतर्गत नियमांतील विविध तरतुदींचे उल्लंघन केल्यामुळे अटकावून ठेवलेल्या वाहन मालकांनी ७ दिवसांच्या आत ताबा न घेतल्यास १६ सप्टेंबर २०२६ रोजी ई लिलाव करण्यात येईल, असे उप प्रादेशिक परिवहन कार्यालयाने कळविले आहे. वाहनांच्या मूळ मालकांना वाहन कर, दंड व इतर देय रक्कम भरण्याबाबत यापूर्वी तीन नोटिसा बजावण्यात आलेल्या आहेत. तथापि, संबंधित वाहनमालकांकडून अद्याप देय रकमेचा भरणा करण्यात आलेला नाही व वाहनांचा ताबाही घेण्यात आलेला नाही. या ४४ वाहनांची यादी कार्यालयाच्या सूचना फलकावर प्रसिद्ध करण्यात आली आहे. संबंधित वाहनमालकांनी, ताबेदारांनी कार्यालयीन प्रकरणांची पूर्तता करून, थकीत कर, दंड व इतर देय रक्कम भरून विहित कालावधीत संबंधित वाहनांचा ताबा न घेतल्यास, कोणतीही पुढील सूचना न देता सदर वाहनांचा भंगार (Scrap) स्वरूपात जाहीर ई-लिलाव उप प्रादेशिक परिवहन कार्यालय, बारामती यांच्यामार्फत www.mstcecommerce.com च्या संकेतस्थळावर करण्यात येईल याची संबंधित वाहनमालक, ताबेदार यांनी नोंद घ्यावी, असेही कळविण्यात आले आहे.

## विद्यार्थ्यासाठी युवक नेतृत्व प्रशिक्षण शिबीराचे आयोजन



■ राजगुरुनगर (दै. संध्या)

क्रीडा आणि युवक सेवा संचालनालय, आणि सुलभ जीवन फौंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने दोन दिवशीय युवक नेतृत्व प्रशिक्षण शिबीर संपन्न झाले.

पेठ येथे शासकीयव अनुसूचित जाती आणि नवबोद्ध मुलांची शाळेत येथे आयोजित करण्यात आलेल्या प्रशिक्षण शिबीर कार्यक्रम दरम्यान डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमा पूजनाने कार्यक्रमास सुरुवात झाली.

मुख्याध्यापक मा. खोसे सर यांनी कार्यक्रम उद्घाटन प्रसंगी विद्यार्थ्यांना स्व- व्यक्तिमत्वाच्या विकासासाठी ह्या नेतृत्व शिबिराचा फायदा करून घेण्याचे आवाहन केले. साधनाताई घाटकर यांनी समाजमाध्यमांचा व्यक्तिमत्व विकासातील वाटा आणि भविष्यातील आव्हानांना कसे सामोरे जावे याबाबत मार्गदर्शन केले.श्री. मुख्तार शेख यांनी आपले मानसिक आणि शारीरिक आरोग्य आणि वर्तन तर श्री एकनाथ खंडागळे यांनी स्व विकासासाठी मनशांती, ताणतणाव व्यवस्थापन आणि अध्यात्म यांची जोड यांचे महत्व विद्यार्थ्यांना पटवून दिले. दुसऱ्या दिवशी श्री. हेमंत भागवत यांनी विद्यार्थ्यांना भावी आयुष्यातील उद्योजक कसे बनायचे आणि आवश्यक कौशल्याचा कसा विकास साधायचा याबाबत मोलाचे मार्गदर्शन केले. अस्मिताताई मोरे यांनी विद्यार्थ्यांना स्वतःमध्ये स्व आणिक सामाजिक जाणिवांचा विकास कसा होतो व योग्य जाणीव कशाप्रकारे जोपासायची आणि वाढवायच्या याबाबत मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांना दृक- श्राव्य तसेच शाळेतील उपलब्ध साधनांचा वापर करून वक्त्यांनी अनेक अवघड विषय सोपे करून समजून दिले. शाळेतील सर्व शिक्षकवृंद आणि कर्मचारी यांनी हे शिबीर यशस्वी करण्यात सहकार्य केले त्याबद्दल सुलभ जीवन फौंडेशन च्या वतीने श्री. शंकर जाधव यांनी आभार व्यक्त केले तसेच कार्यक्रमाचा समारोप सर्वकृष्णन राधाकृष्णन यांना अभिवादन करून करण्यात आला. विद्यार्थ्यांसाठी हा नेतृत्व विकास आणि व्यक्तिमत्व विकास शिबीर कार्यक्रमातील सहभाग त्यांच्या भविष्यातील वाटचालीसाठी नक्कीच दिशादर्शक आणि मार्गदर्शक ठरेल असे मत शाळेचे शिक्षक श्री कोयते सर यांनी कार्यक्रमाच्या आभार प्रदर्शन आणि समारोपावेळी व्यक्त केले.

## श्रावण सहल अजिंक्यतारा किल्ल्यावर बहरली

■ कोरेगावमुळ (दै. संध्या)



सृष्टीतील चराचराला बहर येतो तो श्रावण महिन्यात आणि या बहारामुळेच कवी साहित्यिकांच्या लेखणीतून शब्दांच्या भावनांना नवचैतन्य मिळते. म्हणून साहित्य सम्राट पुणे हि संस्था अनेक वर्षापासून श्रावण महिन्यात निसर्ग सानिध्यात साहित्यिकांच्या गावाला भेट देत असते. श्रावण सहल उपक्रमाद्वारे निसर्ग आणि मराठी भाषेचे सौंदर्य शब्दातून फुलवण्याचे कार्य संस्था करत आहे. आज आपल्या मातृभाषेचे महत्व आपणच घरापासून टिकवण्याची गरज आहे. यावर्षी छत्रपती शिवाजी महाराजांचा अजिंक्यतारा किल्ला तसेच श्री समर्थ रामदास स्वामींचा सज्जनगड अशा आध्यात्मिक आणि ऐतिहासिक प्रेरणादायी स्थळी सहल आयोजित केली आहे. जकातवाडी हे गाव आता कवितांचा गाव म्हणून प्रसिद्ध होत आहे. हे खूप महान आणि महत्त्वाचे कार्य येथील भाषाप्रेमी विचारवंतांनी हाती घेतले आहे. असे मत संस्थेचे संस्थापकअध्यक्ष विनोद अष्टुळ यांनी अध्यक्षीय भाषणात व्यक्त केले. जगातील पहिले कवितांचे गाव येथे माझं कवितांचं गाव आणि साहित्य सम्राट पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने जकातवाडी राजधानी सातारा येथे २२९ वे कवी संमेलन आयोजित केले होते. मंचावर माझं कवितांचं गाव अध्यक्ष प्रल्हाद पारटे, उपाध्यक्ष विश्वास नेरकर, कार्याध्यक्षा सुषमा अलेकरी, जिल्हा अध्यक्ष राजेंद्र पाटील, सचिव प्रज्ञा रोकडे, प्र.पाहुणे शरदचंद्र काकडे, संस्थापक अध्यक्ष विनोद अष्टुळ आणि निवेदक जगदीप वनशिव उपस्थित होते. ऐतिहासिक अजिंक्यतारा किल्ल्याचा भक्कमपणा, सौंदर्य आणि शौर्य मनामध्ये साठवून कवीमनाचे साहित्यप्रेमी अध्यात्मिक विचारांच्या आणि थोरसंत समर्थ रामदास स्वामींच्या कर्तृत्वाने पावन झालेले सज्जनगडावर पोहोचले.

## चाकणला शिक्षकांचा सन्मान व तणावमुक्त जीवनाचा संदेश

■ चाकण (दै. संध्या)

स्व. गुलाबराव गोरे शिक्षण संस्थेत शिक्षक दिन सन्मान सोहळा व तणावमुक्ती समुपदेशन कार्यशाळा उत्साहात संपन्न झाली.

शिक्षक हे समाजाच्या जडणघडणीतील महत्त्वाचे शिल्पकार असून त्यांच्या कार्याचा सन्मान करणे ही संस्थेची जबाबदारी आहे, या भावनेतून स्व. गुलाबराव गोरे शिक्षण संस्थेच्या वतीने शिक्षक दिनानिमित्त सुमारे ८५ शिक्षकांचा सन्मान सोहळा तसेच तणावमुक्ती समुपदेशन कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. संस्थेच्या ज्ञानवर्धिनी विद्यालय, भामा इंग्लिश मिडीयम स्कूल तसेच स्व. आमदार सुरेशभाऊ गोरे माध्यमिक विद्यालय व ज्युनियर कॉलेज, चाकण येथे हा कार्यक्रम उत्साहात पार पडला.



संस्थेच्या संचालक मंडळाच्या वतीने अध्यक्ष विकासभाऊ गोरे, उपाध्यक्ष राजेंद्र गोरे, संचालक अंकुश पवार, विष्णू गोरे, माणिक गोरे व ओंकार गोरे यांच्या उपस्थितीत शिक्षकांचा सन्मान करण्यात आला. कार्यक्रमाचे उद्घाटन व दीपप्रज्वलन नगराध्यक्षा मनिषाताई सुरेशभाऊ गोरे व उपनगराध्यक्षा जयश्रीताई नायकवाडी यांच्या हस्ते झाले.

तणावमुक्त जीवनासाठी सकारात्मक संवाद आवश्यक यावेळी परिवर्तन समुपदेशन संस्थेच्या रेश्माताई कचरे व पुजाताई भालेराव यांनी शिक्षकांना तणावमुक्त जीवनशैलीबाबत मार्गदर्शन केले. नियमित व्यायाम, वेळेवर संतुलित आहार, कामाचे व वेळेचे नियोजन, ६ ते ७ तासांची शांत झोप, स्क्रीन टाईम कमी करणे तसेच मनातील ताणतणावाच्या बाबी जवळच्या व्यक्तींशी मोकळेपणाने व्यक्त करण्याचे महत्त्व त्यांनी सांगितले.

## इंडो नेपाळ ओपन कराटे स्पर्धेमध्ये विद्यार्थ्यांची यशस्वी कामगिरी



■ यवत(दै. संध्या)

इंडो नेपाळ ओपन कराटे स्पर्धेमध्ये दौंड तालुक्यातील विद्यार्थ्यांची यशस्वी कामगिरी केली आहे. रविवार दिनांक (6 ) रोजी शोतोकान रियू कराटे -डो शेशयीकाई असोसिएशन इंडिया यांच्या विद्यमाने इंडो-नेपाळ ओपन कराटे-डो चॅम्पियनशिप चे आयोजन कोळी समाज स्पोर्ट्स हॉल ठाणे मुंबई या ठिकाणी केले होते. या कराटे स्पर्धेसाठी नेपाळ आणि भारतातील अनेक राज्यातून 557 कराटे खेळाडूंनी सहभाग नोंदवला. अशी माहिती आंतरराष्ट्रीय कोच प्रा. कैलास महानोर यांनी दिली.

यशस्वी विद्यार्थी पुढील प्रमाणे 1. अंशुमन अंकुश हाके (वयोगट 14) सुवर्णपदक 2. श्रीतेज भाऊसाहेब कोपनर (वयोगट 12) स्वर्ण पदक 3. आदित्य भिवराज टेंगले (वयोगट 11 ) रौप्यपदक 4. सुयश संदीप हिरवळ (वयोगट 13) रौप्यपदक 5. धनराज प्रमोद टेंगले (वयोगट 13) रौप्यपदक 6. अथर्व संदीप टेळे( वयोगट 11) कांस्यपदक 7. गौरव राजेंद्र टेळे (वयोगट 13) कांस्यपदक या यशस्वी कराटे खेळाडूंचे अभिनंदन जय शंकर प्रतिष्ठानचे अध्यक्ष श्री सुरेश पुराणिक यांनी केले.

या सर्व कराटे खेळाडूंना दत्ता देशमुख प्रा. सचिन राऊत प्रा स्वप्निल भागवत, प्रा. कैलास महानोर यांचे मार्गदर्शन लाभले.

# ग्राहकाने खरेदी केलेल्या गुळाचा गैरवापर; ग्राहकासह दुकानदारही झाला आरोपी

■ राजगुरुनगर (दै. संध्या)

ग्राहकाने खरेदी केलेल्या गुळाचा दारूसाठी गैरवापर केल्याचे निष्पन्न झाल्याने गुळ विक्री करणाऱ्या व्यापाऱ्यावर म्हाळुंगे एम. आय. डी. सी.पोलिसांनी गुन्ह्यात सहभाग असल्याचा ठपका ठेवत गुन्हा दाखल केल्याने राजगुरुनगर व्यापारी महासंघाने संताप व्यक्त करीत निषेध व्यक्त केला आहे.

थोडक्यात माहिती अशी की राजगुरुनगर येथील प्रतिष्ठित व्यापारी सलीम मोमीन व पुत्र शोएब मोमीन यांचे मोमीन प्रोव्हीजन नावाचे किराणा भुसार मालाचे दुकान आहे.पंधरा दिवसापूर्वी संबंधित ग्राहकाने गायींना खाण्यासाठी गुळ आवश्यक असल्याचे सांगत ५०किलो गुळ दुकानातून नेला.मात्र या गुळाचा वापर संबंधित ग्राहकाने उत्तर म्हाळुंगे एम. आय. डी. सी.परिसरात गावठी दारू बनविण्यासाठी उपयोग केला असल्याचे पोलिस कारवाईत सांगण्यात आले.चौकशीत गुळाचा वापर दारूसाठी केल्याने व्यापारी सलीम मोमीन,व शोएब मोमीन यांना पोलिसांनी तुमचा जबाब घ्यायचा असल्याचे सांगत,मोमीन पिता पुत्राला उत्तर म्हाळुंगे एम आय डी एम. पोलिस ठाण्यात नेऊन शोएब मोमीन याच्यावर सदर गुन्ह्यात सहभागी असल्याचा ठपका ठेवत गुन्हा दाखल केला आहे. या अन्यायकारक कारवाईने राजगुरुनगर येथील व्यापाऱ्यांमध्ये चिंतेचे वातावरण पसरले असून जीवनाश्यक वस्तू ची विक्री करणे कायदेशीर गुन्हा ठरणार असेल तर आम्ही त्याचा निषेध करतो.व या प्रकरणाची गांभीर्याने दखल घेऊन निःपक्ष पणे चौकशी करावी अशी मागणी करीत व्यापारी महासंघाने तहसीदार यांना निवेदन दिले.यावेळी व्यापारी महासंघाचे अध्यक्ष माणिक होरे, बंटी लोढा,अमर टाटीया,नगरसेवक फैज मोमीन,अशोक दुगड संजय भंडारी,सतीश ओसवाल,नितीन शहा,सुरेश शिंगवी,कुशल ओसवाल,स्वानंद खेडकर,जितेंद्र चव्हाण,बाळू ओसवाल,भूपेंद्र ओसवाल, श्रीपाल ओसवाल आदी व्यापारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



*** प्रतिष्ठित व्यापारी बाबत झालेली घटना दुर्दैवी आहे.विविध दुकानातून अशा अनेक वस्तु आहे विक्रीनंतर त्याचा दुरुपयोग होतो.म्हणून विक्रेत्यास दोषी ठरविणे उचित नाही.

पोलिस प्रशासनाकडून झालेल्या चुकीच्या कारवाई ने व्यापारी बांधव धास्तावले असून,पोलिसांच्या या चुकीच्या कारवाईचा आम्ही निषेध व्यक्त करतो, असे माणिक होरे अध्यक्ष, राजगुरुनगर शहर व्यापारी महासंघ यांनी सांगितले. दुकानातील अनेक जीवनाश्यक वस्तू मध्ये खाण्याचा गुळाची विक्री होते.संबधित आरोपी ग्राहकाने खरेदी केलेला गुळ कोणत्या कारणासाठी घेतला आणि त्याचा पुढे कथित गैरवापर होईल, याची आम्हाला कोणतीही कल्पना नव्हती. उत्तर म्हाळुंगे पोलिसांनी दारूसाठी गुळ दिला म्हणून पोलिसांनी ११ वाजेपर्यंत पोलिस ठाण्यात बसवून ठेवले. माझ्यावर गुन्हा दाखल करण्याऐवजी माझ्या मुलावर दाखल केला आहे. .पोलिसांनी केलेली कारवाई अन्यायकारक आहे. आम्हाला न्याय मिळाला पाहिजे, असे सलीम मोमीन, दुकानाचे मालक यांनी सांगितले.

गुळ विकला म्हणून व्यापारी बाप लेकावर वर झालेला अन्याय चुकीचा असून प्रशासनाने याची दखल घेऊन ,झालेल्या कारवाईची चौकशी करावी ,मोमीन कुटुंबाला न्याय द्यावा, असे फैज मोमीन नगरसेवक, राजगुरुनगर नगर परिषद यांनी सांगितले.



## पंख जिद्दीचे पुस्तक प्रकाशन सोहळा संपन्न

■ पुणे (दै. संध्या)

पुणे( बाणेर )येथील ओपुलेन्स हॉल येथे पंख जिद्दीचे या पुस्तकाचा प्रकाशन सोहळा अतिशय उत्साही वातावरणात संपन्न झाला. प्रतिक्षा तोंडवळकर यांच्या संघर्षमय व प्रेरणादायी जीवन प्रवासाचे हे पुस्तक असून न्यूज स्टोरी टुडे पब्लिकेशन्सनी प्रकाशित केले आहे. संपादन आहे श्री देवेंद्र भुजबळ यांचे. तसेच पुस्तकाचे मुखपृष्ठ व अंतर्गत मांडणी केली आहे सुधर्म कुलकर्णी यांनी. चारुशीला बिवरे यांनी या पुस्तकाचे शब्दांकन अतिशय साध्या सोप्या आणि ओघवत्या शब्दात केले आहे प्रतिक्षाताईच्या आयुष्याचा संघर्ष, जिद्द, आत्मविश्वास व त्याचबरोबर त्यांनी केलेला यशस्वी प्रवास अतिशय चपखलपणे शब्दबद्ध केला आहे. हे पुस्तक म्हणजे केवळ एका व्यक्तीची जीवनकहाणी न राहता जिद्द असेल तर परिस्थितीच्याही पलीकडे उंच भरारी घेता येते असा संदेश देणारे हे पुस्तक ठरेल. कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलन व ईश स्तवनाने झाली.

RNI No. 1663/1957 (DAILY SANDHYA) |
दैनिक संध्या पब्लिकेशन्स प्रा. लि. यांच्या मालकीचे हे दैनिक मुद्रक व प्रकाशक ज्योती नाळे यांनी सामना प्रेस (प्रबोधन प्रकाशन) सिंहगड रोड, वडगांव खुर्द पुणे-४११०४१ येथे छापून, १०३८ आकार भवन, दुसरा मजला, टिळक रोड, पुणे - ४११००२ येथे प्रसिद्ध केले.
संपादिका : ज्योती नाळे (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी.) (फोन : ०२०-२४४७९२९२)
Daily “Sandhya” News paper is owned by Dainik Sandhya Publications Pvt. Ltd. Printed & Published by Jyoti Nale, Printed at Saamana Press (Prabodhan Prakashan) Pvt. Ltd. Sihagad Road, Vadgaon Khurd, Pune 411 041, published at 1038, Aakar Bhavan, Tilak Road, Pune 411002. Editor - Jyoti Nale.

## थोडक्यात पण महत्वाचे




### ह्युंदाई मोटर इंडियाचे 2030 पर्यंत 20 टक्के महिला कर्मचारी वर्गाचे उद्दिष्ट

**पुणे : दैनिक संध्या**

ह्युंदाई मोटर इंडिया लि.(एचएमआयएल) ने 2030 पर्यंत आपल्या कार्यकारी कर्मचाऱ्यांमध्ये महिलांचे प्रतिनिधित्व 20 टक्क्यांपर्यंत वाढवण्याचे उद्दिष्ट जाहीर केले आहे.वैविध्यपूर्ण आणि भविष्यासाठी सुसज्ज अशी कुशल मनुष्यबळाची फळी तयार करण्यासाठी कंपनीच्या प्रयत्नांमधील हे महत्त्वाचे पाऊल आहे.सध्या एचएमआयएल मध्ये 4000 हून अधिक कार्यकारी कर्मचाऱ्यांपैकी महिलांचे प्रमाण 8 टक्क्यांपेक्षा जास्त आहे.त्याचवेळी 2026 मध्ये भरती करण्यात आलेल्या तरूण कर्मचाऱ्यांपैकी (मॅनेजमेंट ट्रेनीज व इंजिनिअर ट्रेनीज) सुमारे 45 टक्के महिला आहेत. सर्वसमावेशक कार्यस्थळे हे अभिनवता, परस्पर सहकार्य आणि व्यवसायाच्या दीर्घकालीन वाढीला बळकटी देतात. हे उद्दिष्ट या विश्वासाचे प्रतिबिंब आहे. उत्पादन, अभियांत्रिकी, संशोधन व विकास (आरअँन्डडी), विक्री, सेवा, कॉर्पोरेट कार्य व नेतृत्व अशा विविध क्षेत्रात महिलांचा सहभाग वाढत असल्याचे दिसून येत असून यामुळे कंपनीत वैविध्यपूर्ण दृष्टीकोन आणि कौशल्ये येण्यास मदत होईल.




### पुणे फेस्टिव्हल आयोजित लघुपट स्पर्धा “इतिहासाचा वारसा... पुण्याचा आरसा!”

**पुणे : दैनिक संध्या**

पुणे ही केवळ विद्येची, संस्कृतीची आणि कलांची नगरी नाही, तर आपल्या समृद्ध इतिहासाचा आणि वैभवशाली सांस्कृतिक वारशाचा जिवंत आरसा आहे. या नगरीच्या इतिहासाशी जोडलेल्या असंख्य कथा, व्यक्तिमत्त्वे, वास्तू, घटना, परंपरा आणि सांस्कृतिक ठेवा आजही आपल्याशी संवाद साधत आहेत. याच समृद्ध वारशाला दृक्-श्राव्य माध्यमातून नव्या पिढीसमोर आणण्यासाठी पुणे फेस्टिव्हलतर्फे “इतिहासाचा वारसा... पुण्याचा आरसा!” या संकल्पनेवर आधारित लघुपट स्पर्धेचे आयोजन करण्यात येत आहे. या स्पर्धेची संकल्पना व संयोजन ज्येष्ठ अभिनेते राहुल सोलापूरकर यांची असून याचे दिग्दर्शक सुनील नाईक आहेत. पत्रकार परिषदेत त्यांनी ही माहिती दिली. याप्रसंगी पुणे फेस्टिव्हलचे अध्यक्ष कृष्णकुमार गोयल, जनरल सेक्रेटरी व सांस्कृतिक कार्यक्रम मुख्य संयोजक डॉ. सतीश देसाई व विश्वस्त मोहन टिल्लू उपस्थित होते. स्पर्धेची संकल्पना - या स्पर्धेसाठी विषय आयोजकांकडून दिले जातील. स्पर्धकांनी आयोजकांनी दिलेल्या विषयावर ५ ते १० मिनिटांचा लघुपट तयार करावयाचा आहे. विषयाची मांडणी करताना इतिहास, संस्कृती, परंपरा, व्यक्तिमत्त्वे आणि घटनांकडे सर्जनशील आणि सिनेमॅटिक दृष्टिकोनातून पाहण्याची संधी कलावंतांना मिळणार आहे. प्रभावी कथानक, दर्जेदार चित्रिकरण, सुंदर छायांकन, परिणामकारक Voice Over, पार्श्वसंगीत, नाट्यात्मक दृश्यरचना आणि कल्पक सिनेमॅटिक मांडणी यांचा आवश्यकतेनुसार वापर करता येईल. कलावंतांसाठी विशेष संधी - ही स्पर्धा केवळ स्पर्धा नसून नवोदित आणि अनुभवी कलावंतांना आपली प्रतिभा जगासमोर मांडण्याचे व्यासपीठ आहे. लघुपट बनवणाऱ्या कलावंतांना जागतिक ओळख मिळवून देण्याची ही एक अनोखी संधी आहे. पुण्याच्या इतिहासाची कथा तुमच्या कॅमेऱ्यातून उलगडू द्या. तुमची कल्पना, तुमची दृष्टी आणि तुमची कलाकृती — पुण्याच्या इतिहासाला नवा सिनेमॅटिक आरसा देऊ शकते!

### शंतनू गोखले यांच्या संतूरवादनाने रसिक मंत्रमुग्ध

**पुणे : दैनिक संध्या**

सहजीवन गणेशोत्सव मित्र मंडळ ट्रस्टच्या सांस्कृतिक महोत्सवानिमित्त सहजीवन गणेश मंदिर मंडप, सहकारनगर क्रमांक २ येथे आयोजित संतूरवादक शंतनू गोखले यांच्या बहारदार संतूरवादनाच्या कार्यक्रमाला रसिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. पंडित शिवकुमार शर्मा यांचे शिष्य असलेल्या शंतनू गोखले यांनी शास्त्रीय, उपशास्त्रीय, चित्रपटसंगीत आणि विविध धुन यांचा सुरेल संगम घडवत उपस्थितांना अविस्मरणीय संगीतानुभव दिला. तबल्याची मोलाची साथ ओंकार तोडकर यांनी दिली. तबला आणि संतूर वादनाच्या जुगलबंदीने रसिक मंत्रमुग्ध झाले. कार्यक्रमाची सुरुवात राग गावतीने झाली. रूपक तालातील सात मात्रांच्या रचनेने मैफलीला सुरेल प्रारंभ झाला. त्यानंतर तीनतालातील सादरीकरणातून रागाचे विविध पैलू खुलवत त्यांनी शास्त्रीय संगीताची समृद्ध परंपरा रसिकांसमोर उलगडली. भारताच्या सांस्कृतिक आणि आध्यात्मिक परंपरेशी शास्त्रीय संगीताचे असलेले नाते अधोरेखित करत त्यांनी संतूर ऐकताना काही क्षण डोळे बंद करून स्वरांचा अनुभव घेण्याचे आवाहन केले. त्यानंतर तबल्याची साथ सुरू होताच संतूर आणि तबल्यामधील जुगलबंदीने अप्रतिम लयकारीने कार्यक्रमाला अधिक रंगत आली. पुढे उपशास्त्रीय रचना, चित्रपटगीते आणि विविध धुन यांच्या सादरीकरणालाही रसिकांनी भरभरून दाद दिली. या कार्यक्रमाला प्रसिद्ध व्हायोलिनवादक अतुलकुमार उपाध्ये यांनी आवर्जून उपस्थिती लावली. या सांस्कृतिक महोत्सवाचे अध्यक्ष राजेश दातार, ट्रस्टचे अध्यक्ष नितीन पाटील, उपाध्यक्ष सुयश साबडे, कार्याध्यक्ष मदन कटारिया यांनी सदरील माहिती दिली.



# संगीत चिकित्सा क्षेत्रात अभ्यासक्रमाची नवी संधी

## डॉ. पंडित शशांक कट्टी यांची पत्रकार परिषदेत माहिती; रविवारी (ता. १३) संगीतविषयक विनामूल्य सेमिनार

■ पुणे (दै. संध्या)

संगीत ही केवळ कला नाही, तर मानसिक, भावनिक आणि शारीरिक आरोग्य सुधारण्यासाठी प्रभावी उपचारपद्धती आहे. ही बाब लक्षात घेत यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या मान्यतेने सूर संजीवन म्युझिक थेरपी ट्रस्टतर्फे ‘सुर संजीवन (क्युरेटिव्ह म्युझिक)’ हा संगीत चिकित्सा (म्युझिक थेरपी) पदविका अभ्यासक्रम सुरू करण्यात येत आहे. १५ सप्टेंबरपासून या अभ्यासक्रमाला सुरुवात होत असून, याविषयी संगीतसाधकांना अधिक माहिती व्हावी, यासाठी येत्या रविवारी (ता. १३) सायंकाळी ५ ते ७ यावेळेत कर्नाटक संघ, दुसरा मजला, सिद्धार्थ टॉवर्स, कोथरूड पुणे येथे संगीतविषयक विनामूल्य सेमिनारचे आयोजन केले आहे, अशी माहिती सूर संजीवन म्युझिक थेरपी ट्रस्टचे संस्थापक व ज्येष्ठ सतारवादक डॉ. पं. शशांक कट्टी यांनी पत्रकार परिषदेत दिली.




डॉ. पं. शशांक कट्टी म्हणाले, "संगीत ही एक प्रभावी उपचारपद्धती आहे. या अभ्यासक्रमातून वैज्ञानिक आधारावर संगीत चिकित्सेचे ज्ञान विद्यार्थ्यांना मिळेल. संगीताच्या माध्यमातून अनेकांच्या जीवनात सकारात्मक बदल घडवण्याची ही संधी आहे. हा अभ्यासक्रम जगभरात ऑनलाइन स्वरूपात उपलब्ध आहे, तसेच पुणे आणि मुंबई येथे ऑफलाइन स्वरूपातही उपलब्ध असणार आहे. एक वर्षाचा पदविका अभ्यासक्रम पूर्ण केल्यानंतर विद्यार्थ्यांना विद्यापीठाचे (शासकीय मान्यताप्राप्त) पदविका प्रमाणपत्र मिळेल. त्यामुळे त्यांच्या करिअरच्या उत्तम संधी निवडण्यास मदत होईल. संगीत क्षेत्रात करिअर करू इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांबरोबरच डॉक्टर, समुपदेशक, विशेष बालशिक्षक, मानसोपचारतज्ज्ञ आणि समाजकार्य क्षेत्रातील व्यावसायिकांसाठीही हा अभ्यासक्रम उपयुक्त ठरणार आहे. संगीताच्या माध्यमातून आरोग्य, समतोल आणि सकारात्मक जीवनशैलीचा संदेश देणारा ‘सुर संजीवन’ अभ्यासक्रम हा वास्तवात उपचारक संगीत क्षेत्रात नवा अध्याय ठरेल, अशी अपेक्षा आहे."

डॉ. संगीता सांगवीकर म्हणाल्या, "आतापर्यंत डॉ. कट्टी यांनी ४५० विद्यार्थ्यांना प्रशिक्षण दिले असून, त्यापैकी ८० ते ९० विद्यार्थी हे प्रॅक्टिस करणारे डॉक्टर आहेत. अनेकजण संगीत चिकित्सा प्रत्यक्ष वापर करीत आहेत. आता नव्याने सुरु होणाऱ्या अभ्यासक्रमाची सुरवात सप्टेंबरपासून होणार असून, त्यासाठी ऑनलाइन नोंदणी सुरू झाली आहे. अभ्यासक्रमाची रूपरेषा, अभ्यास पद्धती, प्रवेश प्रक्रिया, पात्रता, शुल्क आदींबाबत सविस्तर माहिती देण्यासाठी रविवारी (ता. १३) मोफत सेमिनार होत आहे. संगीत चिकित्सा क्षेत्रातील महत्त्व, विविध क्षेत्रांतील उपयोग आणि विद्यार्थ्यांसाठीच्या संधी याबाबत मार्गदर्शन करण्यात येणार आहे. अधिक माहिती व प्रवेशासाठी डॉ. पं. शशांक कट्टी (९८२००४६९२०) किंवा डॉ. संगीता सांगवीकर (९९६००६१०२९) यांच्याशी संपर्क साधावा किंवा https://ycmou.ac.in/ या संकेतस्थळाला भेट द्यावी."

डॉ. पं. शशांक कट्टी म्हणाले, "याआधी म्युझिक थेरपीचा सर्टीफिकेट अभ्यासक्रम होता. पण आताच्या अभ्यासक्रमाला शासनाची मान्यता मिळाल्याने जे विद्यार्थी कोर्स करतील त्यांना सरकारी मान्यता मिळणार असून ते म्युजिक थेरपी विषयात प्रॅक्टिस करू शकतात. आपल्याकडे या थेरपीबद्दल पुरेशी जागरुकता नाही. यामध्ये तीन प्रकारचे संगीत शिकवले जाणार आहे. यात होलिस्टिक (योग, प्राणायाम) शारीरिक व्याधींचे निराकरण होण्यासाठी उपयोग, आरोग्य संगीत (क्लासिकल संगीत, रागांचे संगीत) मनावर संगीताचा चांगला परिणाम व्हावा यासाठी उपयुक्त असे संगीत आणि रागसंगीत याबाबत मार्गदर्शन केले जाणार आहे. या थेरपीच्या उपयुक्ततेबाबत बरेच संशोधन झालेले असून, अर्थरायटिस, गुडघेदुखी, अस्थमा, वेळेच्या आधी जन्माला आलेल्या बालकांचा विकास यांसारख्या समस्यांवर संगीत थेरपीने यशस्वी उपचार केले आहेत. तेव्हा संगीत विषयात काम करु इच्छिणाऱ्यांनी हा डिप्लोमा कोर्स नक्की करायला हवा."

## पुणे मशीन टूल एक्स्पो 2026 आणि फॅक्टेक (FACTEQ) 2026 चे पुण्यात उद्घाटन

■ पुणे (दै. संध्या)

इंडियन मशीन टूल मॅन्युफॅक्चरर्स असोसिएशन (IMTMA) यांच्या वतीने आयोजित पुणे मशीन टूल एक्स्पो (PMTX) 2026 आणि त्यासोबत आयोजित फॅक्टरी इक्विपमेंट एक्स्पो (FACTEQ) 2026 चे आज पुणे इंटरनॅशनल एक्झिबिशन अँड कन्व्हेन्शन सेंटर (PIECC), मोशी, पुणे येथे उद्घाटन करण्यात आले.

या प्रदर्शनाचे उद्घाटन महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाचे (MIDC) मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. दीपेंद्र सिंह कुशवाह, आयएएस, महाराष्ट्र सरकारच्या उद्योग विकास आयुक्त डॉ. कादंबरी बलकवडे, आयएएस, टाटा ऑटोकॉम्प सिस्टिम्स लिमिटेडचे उपाध्यक्ष श्री. अरविंद गोयल आणि महिंद्रा अँड महिंद्राच्या ऑटोमोटिव्ह विभागाचे मुख्य कार्यकारी अधिकारी तसेच महिंद्रा इलेक्ट्रिक ऑटोमोबाईल लिमिटेडचे कार्यकारी संचालक श्री. नलिनीकांत गोल्लागुंटा यांच्या हस्ते करण्यात आले.




उद्घाटन कार्यक्रमाला आयएमटीएमएच्या अध्यक्षा सुश्री मोहिनी केळकर, आयएमटीएमएचे उपाध्यक्ष श्री. विक्रम साळुंके आणि आयएमटीएमएचे महासंचालक व मुख्य कार्यकारी अधिकारी (DG & CEO) श्री. जिबाक दासगुप्ता हे उपस्थित होते.

पुण्यात हे प्रदर्शन आयोजित करण्याच्या आयएमटीएमएच्या निर्णयाबाबत बोलताना श्रीमती मोहिनी केळकर म्हणाल्या, “महाराष्ट्रात भारतातील सर्वात मजबूत मशीन टूल उद्योग व्यवस्था आहे. पुणे, मुंबई, औरंगाबाद, नाशिक आणि कोल्हापूर येथे महत्त्वाचे औद्योगिक समूह आहेत. पुणे हे ऑटोमोबाईल आणि इंजिनिअरिंग कंपन्यांचे प्रमुख केंद्र असल्याने येथे उच्च अचूकतेच्या उत्पादन तंत्रज्ञानाची मोठी गरज आहे. ही गरज मशीन टूल उद्योग पूर्ण करतो. महाराष्ट्रात आयएमटीएमएची मजबूत उपस्थिती असून, संस्थेचे सुमारे 180 सदस्य आहेत. गेल्या दोन दशकांपासून विविध उपक्रमांच्या माध्यमातून आयएमटीएमए उद्योगांना सातत्याने सहकार्य करत आहे.”

श्रीमती केळकर यांच्या मतांशी सहमती दर्शवत आयएमटीएमएचे महासंचालक आणि मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. जिबाक दासगुप्ता म्हणाले, “पुणे हे विविध उत्पादन उद्योगांचे महत्त्वाचे केंद्र आहे. त्यामुळे या भागातील उत्पादन क्षेत्रातील उद्योजकांपर्यंत पोहोचण्यासाठी आयएमटीएमए कडून पीएमटीएक्स आणि फॅक्टेक (FACTEQ) प्रदर्शनांचे आयोजन करण्यात आले आहे. प्रत्येक आवृत्तीसोबत या प्रदर्शनांचा मोठ्या प्रमाणात विस्तार होत आहे. मशीन टूल्सचे उत्पादक आणि त्यांचा वापर करणाऱ्या कंपन्यांकडूनही या प्रदर्शनांना मोठा उत्साह पाहायला मिळत आहे.”

## तरुणांमध्ये नियोजित कर्ज घेण्याचा वाढता कल, अनुभवाधारित खर्चामुळे कर्जाची नवी लाट

■ पुणे (दै. संध्या)

भारतात वैयक्तिक कर्जाच्या पद्धतीमध्ये मोठा बदल होत आहे. एकेकाळी प्रामुख्याने आणीबाणी किंवा आर्थिक अडचणींशी जोडली जाणारी वैयक्तिक कर्जे आता आकांक्षी आणि व्यावहारिक अशा दोन्ही गरजा पूर्ण करण्यासाठी नियोजित आर्थिक साधन म्हणून वापरली जात आहेत. हा बदल विशेषतः तरुण ग्राहक आणि श्रीमंत कर्जदारांमध्ये दिसून येत आहे, जे दीर्घकालीन गुंतवणुकीला धक्का न लावता मोक्याच्या वेळी कर्जाचा वापर करण्यास अधिक सोयीस्कर मानत आहेत.

कोटक महिंद्रा बँकेचे पर्सनल लोन्सचे बिझनेस हेड अमित पाठक म्हणाले, "हा बदल दोन समांतर प्रवाहांमुळे होत आहे: कर्जदारांच्या वर्तनातील बदल आणि एआय-आधारित अंडररायटिंगचा वाढता वापर. जलद, सुलभ आणि अधिक स्थिर कर्जाच्या उपलब्धतेकडे ग्राहकांची अपेक्षा बदलत आहे, तसतसे बँका देखील अधिक स्मार्ट जोखीम मूल्यांकन आणि फसवणूक शोधण्याच्या क्षमतेमध्ये गुंतवणूक करत आहेत".

या बदलाचा मुख्य चालक म्हणजे अनुभवाधारित कर्जाबाबत वाढणारी सुविधा होय. तरुण ग्राहक, विशेषतः जेन झी आणि पहिल्यांदाच कमाई करणारे प्रवास, लग्नसराई, जीवनशैलीतील खरेदी आणि आयुष्यातील इतर महत्त्वाच्या अनुभवांसारख्या ऐच्छिक खर्चासाठी कर्जाचा वापर करण्यास उत्सुक आहेत. कर्जाकडे सावधगिरीने पाहणाऱ्या पूर्वीच्या पिढ्यांच्या तुलनेत तरुण कर्जदार कर्जाकडे साधन म्हणून पाहतात, जे त्यांना भविष्यातील कमाईच्या क्षमतेनुसार वर्तमान आकांक्षा पूर्ण करण्यास मदत करते. तसेच, नियोजित कर्जाच्या या वाढीसोबत जबाबदार कर्ज व्यवहाराची प्रबळ संस्कृती निर्माण होत आहे, ज्यामध्ये ग्राहक शिस्तबद्धपणे परतफेड, उत्तम क्रेडिट स्कोअर राखणे आणि स्वतःच्या क्षमतेनुसार कर्ज घेण्याला अधिक महत्त्व देत आहेत.

बँका एआय व मशीन लर्निंग-आधारित अंडररायटिंग मॉडेल्सद्वारे कर्जाचे मूल्यांकन आणि वितरण करण्याच्या पद्धतीत बदल करत आहेत. कर्जाची प्रक्रिया अधिक डिजिटल होत आहे, तसे एआय जलद, अधिक अचूक आणि सुरक्षित निर्णय घेण्यास सक्षम करण्यात महत्त्वाची भूमिका बजावत आहे. ही मॉडेल्स नियमन आराखड्याच्या अंतर्गत तयार आणि लागू केली जात आहेत, ज्यामध्ये मानवी देखरेख देखील निर्णय प्रक्रियेत महत्त्वाची भूमिका बजावत आहे. बँका कर्ज मंजुरीचे निर्णय घेण्यासाठी केवळ एआयच्या आउटपुटवर अवलंबून नाहीत. व्यापक अंमलबजावणीपूर्वी मॉडेल्सची लहान गटांवर चाचणी केली जाते, ज्याचे निकाल वेळेनुसार तपासून सुधारले जातात.

# मी आजही भिक्षुकी करते, हा विषय पैशांचा नाही, तर माझ्या अस्तित्वाचा आहे; सई राजेंद्र भराट यांचे मत

■ पुणे (दै. संध्या)

माझा समुदाय अत्यंत संघर्षातून आज इथपर्यंत पोहोचला आहे. मी आजही भिक्षुकी करते. हा विषय पैशांचा नाही, तर माझ्या अस्तित्वाचा आहे. मला तृतीय क्रमांकाचे स्थान दिले जाते. पण प्रथम आणि द्वितीय क्रमांकावर कोण आहे? हे क्रमांक ठरवणारे कोण? मीसुद्धा तुमच्यासारखाच आहे. मी तुमचाच एक भाग आहे. मी वेगळा नाही. माझे मन, माझ्या भावना आणि माझ्या संवेदना तुमच्यासारख्याच आहेत. तुमच्याकडून माझ्याकडे पाहण्याची एकतर्फी दृष्टी असणे माझ्यासाठी खूप वेदनादायक आहे. काही लोक मला वेगळ्या वर्गात ठेवतात. अशा वेळी मला त्यांना विचारावेसे वाटते जर मी तिसऱ्या वर्गातला असेन, तर पहिल्या वर्गात कोण आहे? स्त्री की पुरुष? आणि प्रत्येक व्यक्तीचा वर्ग ठरवण्याचा अधिकार तुम्हाला कोणी दिला? असे मत तृतीयपंथीय हिंदुत्ववादी सामाजिक कार्यकर्त्या सई राजेंद्र भराट (सई नगरकर) यांनी व्यक्त केले.

हिंदुस्थानातील पहिले शंखवादकांचे पथक म्हणून ओळख असलेल्या केशव शंखनाद पथकाच्या १०व्या वर्धापन दिनानिमित्त समाजाच्या हक्कांसाठी, सामाजिक सन्मानासाठी तसेच धार्मिक व सामाजिक प्रबोधनासाठी उल्लेखनीय कार्य करणाऱ्या सई राजेंद्र भराट (सई नगरकर) यांना ‘केशव सन्मान पुरस्कार २०२६’ टिळक रस्त्यावरील स. प. महाविद्यालयाच्या लेडी रमाबाई सभागृहात प्रदान करण्यात आला. यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ह. भ. प. चिदंबरमेश्वर महाराज साखरे (श्री गुरु साखरे महाराज साधक आश्रम, आळंदी) होते. केशव शंखनाद पथकाचे संस्थापक अध्यक्ष नितीन महाजन, किशोर चव्हाण, पथकाचे सचिव रणजीत हगवणे, काळूराम डोमाळे, शीला गिरमे, अरुण कापसे, सुहास मदनाल, प्रमोद डोंगरे, शैलेंद्र भालेराव, महेंद्र बेचवडे यांच्या सह पथकाचे संचालक मंडळ उपस्थित होते.

सई भराट म्हणाल्या, समाजापासून वंचित घटकाला तुम्ही आपलेसे केले, सन्मानित केले, याबद्दल शंखनाद पथकाचे आभार व्यक्त करते.

ज्या सनातन धर्माने माझ्या समुदायाला सन्मान दिला, त्यांच्यासाठी बोलणे हेही माझे कर्तव्य आहे. जिथे कुठे अन्याय किंवा चुकीची घटना घडत असेल आणि माझ्या लक्षात येत असेल, तिथे त्याविरोधात आवाज उठवणे हे माझे कर्तव्य आहे. जी व्यक्ती भिक्षुकी करते, तिने प्रत्येकाच्या दारात जाऊन धर्माची बाजू मांडणे, धर्माबद्दल सांगणे आणि धर्माचा विचार पुढे नेणे, हेच खरे धर्मकार्य आहे.



ह. भ. प. चिदंबरमेश्वर महाराज साखरे म्हणाले, समस्या मांडणाऱ्यांची संख्या मोठी आहे; मात्र त्यावर उपाय सांगणारे कमी आहेत. सनातन धर्माने जितक्या प्रकारची चिकित्सा स्वीकारली, तितकी व्यापकता जगातील अन्य कोणत्याही धर्माने स्वीकारलेली नाही. असे असतानाही आपल्या धर्माविषयी बोलणाऱ्यांची संख्या कमी होत आहे. मंदिरांमध्ये प्रबोधन, समाजाचे एकत्रीकरण आणि धर्मजागरण झाले पाहिजे. काही ठिकाणांहून केवळ आदेश निघतात; मात्र आपल्यात संवादाचा अभाव आहे. घरात, कुटुंबातही संवाद राहिलेला नाही.

ते पुढे म्हणाले, उत्सव अधिक सकारात्मक पद्धतीने कसे करता येतील, याचा विचार झाला पाहिजे. उत्सवांच्या निमित्ताने हिंदू समाज मोठ्या संख्येने एकत्र येतो. त्यामुळे समाजाच्या एकत्रीकरणासाठी आणि प्रबोधनासाठी याच माध्यमाचा प्रभावीपणे उपयोग केला पाहिजे. संपूर्ण शिक्षण व्यवस्था मंदिरांच्या माध्यमातून चालली पाहिजेत.

किशोर चव्हाण म्हणाले, कोणत्याही उपक्रमाच्या यशासाठी सातत्य महत्त्वाचे आहे. आपण सातत्याने शंखनाद पथकाशी जोडलेले असून, शंखनादामुळे घरातील वातावरण प्रसन्न राहण्यास मदत होते. विश्व हिंदू परिषदेच्या माध्यमातून हे शंखनाद पथक निर्माण झाले आहे. त्यामुळे शंखनादापुरते मर्यादित न राहता व्यसनाधीनता निर्मूलन, सामाजिक समरसता आणि एकत्र कुटुंब पद्धतीचे संवर्धन अशा विविध सामाजिक उपक्रमांमध्येही आपण सक्रिय सहभाग घेतला पाहिजे.

नितीन महाजन म्हणाले, मंदिरे ही समाजाच्या एकत्रीकरणाची आणि शक्तीची केंद्रे आहेत. मात्र, कालांतराने मंदिरांमध्ये एकत्र येण्याची परंपरा कमी होत गेली. ही उणीव भरून काढण्यासाठी शंखनाद पथकाची स्थापना करण्यात आली. अवघ्या चार जणांपासून सुरू झालेला हा प्रवास आज ६ हजार ५०० सदस्य आणि ३७ केंद्रांपर्यंत पोहोचला आहे. तसेच भारताबाहेर अमेरिका व लंडन या देशात देखील प्रशिक्षण वर्ग सुरू करून शंखनादाच्या माध्यमातून समाजाला एकत्र आणण्याबरोबरच शंखनादाचे आरोग्यासाठीही अनेक फायदे आहेत.

दैनिक संध्या | बुधवार, दि. ०९ सप्टेंबर २०२६



# खेड तालुक्यात अवैध गौण खनिज उत्खनन करणाऱ्यांना दणका

■ राजगुरूनगर (दै. संध्या)

खेड तालुक्यात अवैध गौण खनिज उत्खनन आणि बेकायदेशीर वाहतुकीला आळा घालण्यासाठी महसूल प्रशासनाने कारवाईची मोहीम अधिक तीव्र केली आहे. अवैध गौण खनिज उत्खनन व वाहतूक प्रकरणांत महसूल विभागाने दंड ठोठावूनही त्याची रक्कम न भरणाऱ्या २० खातेदारांच्या जमिनींचा शासनामार्फत जाहीर लिलाव करण्यात येणार आहे, अशी माहिती खेडचे तहसीलदार प्रशांत बेडसे यांनी पत्रकार परिषदेत दिली.

अवैध उत्खननामुळे शासनाच्या महसुलाचे नुकसान होत असून, पर्यावरणीय तसेच सार्वजनिक मालमत्तेवरही त्याचा परिणाम होत आहे. या पार्श्वभूमीवर खेड महसूल प्रशासनाने संबंधितांवर कठोर कारवाई करण्याची भूमिका घेतली आहे. केवळ दंडाची नोटीस बजावून कारवाई थांबविण्याऐवजी दंडाची रक्कम वसूल करण्यासाठी उपलब्ध असलेल्या कायदेशीर तरतुदींचा वापर करण्यात येत असल्याचे तहसीलदार बेडसे यांनी स्पष्ट केले.



अवैध गौण खनिज उत्खनन आणि वाहतुकीसंदर्भात संबंधित खातेदारांवर दंडात्मक कारवाई करण्यात आली होती. मात्र, निर्धारित दंडाची रक्कम संबंधितांकडून भरली न गेल्याने आता महसूल वसुलीची पुढील प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. त्यानुसार २० खातेदारांच्या जमिनींचा शासकीय पद्धतीने जाहीर लिलाव करण्याची कार्यवाही केली जाणार आहे. या कारवाईमुळे अवैध गौण खनिज उत्खनन करणाऱ्यांमध्ये तसेच दंडाची रक्कम थकविणाऱ्यांमध्ये प्रशासनाचा धाक निर्माण होण्याची शक्यता आहे. शासनाच्या महसुलाची थकबाकी वसूल करण्यासाठी प्रशासन कोणतीही कुचराई करणार नसल्याचा संदेश या कारवाईतून देण्यात आला आहे. दरम्यान, अवैध गौण खनिज उत्खनन आणि वाहतुकीशी संबंधित प्रकरणांमध्ये सात कंपन्यांविरोधातही कायदेशीर कारवाई सुरू करण्यात आली आहे.

संबंधित कंपन्यांकडून शासनाचा दंड वसूल करण्यासाठी सिव्हिल प्रोसिजर कोड अंतर्गत प्रक्रिया राबविण्यात येत असल्याची माहिती तहसीलदार प्रशांत बेडसे यांनी दिली. जमिनींच्या प्रस्तावित लिलावाची प्रक्रिया कोणत्या टप्प्यावर आहे, संबंधित जमिनींची नेमकी संख्या, क्षेत्रफळ, थकीत दंडाची रक्कम आणि लिलावाच्या तारखा याबाबतची अधिकृत माहिती प्रशासनाकडून पुढील टप्प्यात जाहीर केली जाण्याची शक्यता आहे.

अवैध गौण खनिज उत्खनन आणि बेकायदेशीर वाहतूक करणाऱ्यांवर नियमानुसार कठोर कारवाई केली जाईल. दंडाची रक्कम न भरणाऱ्या खातेदारांकडून शासनाची थकबाकी वसूल करण्यासाठी जमिनींच्या लिलावाची प्रक्रिया राबविण्यात येणार आहे, असे तहसीलदार प्रशांत बेडसे यांनी स्पष्ट केले.

## थोडक्यात पण महत्वाचे



### समर्थ शैक्षणिक संकुलात शिक्षक दिन उत्साहात साजरा

**जुन्नर : दैनिक संध्या**

भारताचे माजी राष्ट्रपती, महान तत्त्वज्ञ आणि शिक्षणतज्ज्ञ डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांचा जन्मदिन देशभरात शिक्षक दिन म्हणून साजरा केला जातो.शिक्षकांच्या ज्ञानदानाच्या कार्याचा गौरव आणि त्यांच्या योगदानाप्रती कृतज्ञता व्यक्त करण्याच्या उद्देशाने समर्थ शैक्षणिक संकुल, बेल्हे-बांगरवाडी येथे विविध विभागांच्या वतीने शिक्षक दिन उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. यावेळी विविध महाविद्यालये व शैक्षणिक विभागांमध्ये डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. शिक्षक दिनाचे महत्त्व, शिक्षकांची सामाजिक भूमिका तसेच विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासात शिक्षकांचे योगदान याबाबत मान्यवरांनी मार्गदर्शन केले. समर्थ कॉलेज ऑफ कॉम्प्युटर सायन्स येथे आयोजित कार्यक्रमाची सुरुवात डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून करण्यात आली. यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. उत्तम शेलार, डॉ. लक्ष्मण घोलप, राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी प्रा. दिनेश जाधव, प्रा. कल्याणी शेलार, बी.एस्सी. आयटी विभागाचे विभागप्रमुख प्रा. विलास गवारी, परीक्षा विभागाच्या विभागप्रमुख प्रा. डॉ. प्रणाली साळुंके यांच्यासह विविध विभागांचे विभागप्रमुख, प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.



### रस्त्याच्या दुरुस्तीसाठी ग्रामस्थ आक्रमक, आमरण उपोषण करण्याचे संकेत

**चाकण: दैनिक संध्या**

चाकण मार्गे वाघजाईनगरकडे जाणाऱ्या बिरदवडी फाटा ते तळेगाव रस्त्याची अत्यंत दुरावस्था झाली असून, रस्त्याच्या दुरुस्तीसाठी ग्रामस्थ आक्रमक झाले आहेत. वाघजाईन नगर येथील ग्रामस्थांनी आमरण उपोषण करण्याचा इशारा दिला आहे. सन २०१२ साली रस्ता तयार झाल्यानंतर प्रशासनाने त्याकडे ढुंकूनही पाहिले नसल्याने रस्त्यावर मोठमोठे खड्डे पडले आहेत. यामुळे वाघजाईनगर ग्रामस्थ आणि परिसरातील कंपन्यांना मोठा मनस्ताप सहन करावा लागत आहे. या विरोधात आता ग्रामस्थ आक्रमक झाले असून, त्यांनी प्रशासनाला अल्टिमेटम देत आमरण उपोषणाचा इशारा दिला आहे. माजी उपसरपंच ज्ञानेश्वर उर्फ बाळासाहेब शिळवणे यांनी या रस्त्याच्या दुरुस्तीसाठी आमरण उपोषण करण्याचा इशारा दिला होता. या पार्श्वभूमीवर आमदार बाबाजी काळे यांनी शिळवणे आणि ग्रामस्थांची भेट घेऊन त्यांची समजूत काढली. त्यांनी रस्त्याच्या कामाबाबत लवकरच मार्ग काढण्याचे आश्वासन दिल्यानंतर, शिळवणे यांनी सध्या उपोषण स्थगित केले आहे. मात्र, पुढील दोन महिन्यांत जर या रस्त्याचे काम मार्गी लागले नाही, तर सर्व ग्रामस्थ बाळासाहेब शिळवणे यांच्या उपोषणाला पाठिंबा देणार असून त्यांच्यासोबत आमरण उपोषणाला बसणार असल्याचे स्पष्ट केले आहे.



### नवयुग मित्र मंडळाला गणराया ॲवार्ड

**चाकण : दैनिक संध्या**

आठ वर्षापासून जिवंत देखाव्याची परंपरा कायम राखणाऱ्या येथील नवयुग मित्र मंडळाने पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालय परिमंडल क्रमांक तीनच्या वतीने सन - २०२५ मध्ये घेतलेल्या गणराया ॲवार्ड स्पर्धेत 'कुणी घेतलाय बहिण हिस्सा' या जिवंत देखाव्याचा प्रथम क्रमांक आल्याने या मंडळाचा गौरव करण्यात आला. येथे आयोजित करण्यात आलेल्या एका कार्यक्रमात धनंजय कुलकर्णी, सुभाष भानुसरे, अजित वडगावकर, संदीप पोलकम, संतोष खवळे, शशिकांत हुले, लक्ष्मण शिंदे, क्षमा धाडगे, विजय सूर्यवंशी व योगिता तरडे आदींच्या हस्ते नवयुग मित्र मंडळाचा गौरव करण्यात आला. चाकण नगरपरिषदेचे नगरसेवक मंगेश कांडगे यांच्या संकल्पनेतून उमेश राऊत यांनी या देखाव्याचे लेखन केले होते. नंदकुमार वाव्हळ, सम्राट राऊत, रोहन कदम, तेजस राऊत, कौस्तुभ साळुंखे, योगेश गायकवाड, गणेश राऊत आदींनी हे प्रथम क्रमांकाचे अवॉर्ड स्वीकारले. पोलीस आयुक्त विनयकुमार चौबे, नगराध्यक्षा मनिषा गोरे, उपनगराध्यक्षा जयश्री नायकवाडी आदींनी मंडळाच्या कार्यकर्त्यांचे कौतुक केले. " गेल्या आठ वर्षांपासून हे मंडळ स्थानिक कलाकारांच्या कलेला प्रोत्साहन देण्यासाठी जिवंत देखावे सादर करत आहेत. या देखाव्यांना प्रचंड प्रतिसाद मिळतो. हे मंडळ प्रत्येक क्षेत्रात आघाडीवर असल्याने लोकोपयोगी कामांच्या माध्यमातून नावलौकिक वाढला आहे., असे मंगेशभाऊ कांडगे, नगरसेवक, चाकण यांनी सांगितले.

# बोरोप्लसचा बेबी केअर क्षेत्रात प्रवेश; नवीन रेंज लाँच

■ कोलकाता (दै. संध्या)

आईच्या प्रेमाचा स्पर्श, नैसर्गिक घटकांची समृद्धी आणि आधुनिक तंत्रज्ञानाची जोड देत एफएमसीजी क्षेत्रातील प्रमुख कंपनी ईमामी लिमिटेडच्या स्किनकेअर ब्रँड बोरोप्लसने 'बोरोप्लस FromMaa' या नवीन बेबी केअर रेंजचे लाँच करण्याची घोषणा केली आहे. आजच्या पिढीतील आई-वडिलांच्या गरजा लक्षात घेऊन ही रेंज विकसित करण्यात आली असून, बाळांच्या कोमल त्वचेची निगा राखण्यासाठी विशेष फॉर्म्युलेशनचा वापर करण्यात आला आहे. 'With Love, From Maa' या संकल्पनेवर आधारित या रेंजमध्ये आईचे प्रेम, काळजी आणि संरक्षणाची भावना आधुनिक बेबी केअर सोल्यूशन्ससोबत जोडण्यात आली आहे. बाळाच्या त्वचेची कोमलता आणि पोषण लक्षात घेऊन उत्पादनांमध्ये मामरा आल्मंड, काश्मिरी केशर आणि मिल्क प्रोटीन यांसारख्या नैसर्गिक घटकांचा समावेश करण्यात आला आहे. कंपनीच्या माहितीनुसार, बोरोप्लस FromMaa रेंजमधील उत्पादने बालरोगतज्ज्ञांकडून मंजूर असून त्वचारोगतज्ज्ञांद्वारे त्यांची चाचणी करण्यात आली आहे. त्यामुळे



नैसर्गिक घटकांसोबत तज्ज्ञांचा विश्वास आणि आधुनिक फॉर्म्युलेशनचा समन्वय साधण्याचा प्रयत्न या उत्पादनांमधून करण्यात आला आहे. भारतामधील बेबी केअर उत्पादनांच्या बाजारपेठेत सातत्याने वाढ होत असून, या बाजाराचे मूल्य ४० हजार कोटी रुपयांपेक्षा अधिक असल्याचे कंपनीने नमूद केले आहे. वाढत्या बाजारपेठेसोबतच आजचे पालकही आपल्या बाळांसाठी उत्पादन निवडताना अधिक जागरूक झाले आहेत. उत्पादनातील घटक, त्वचेवर होणारा परिणाम, तज्ज्ञांचा सल्ला आणि उत्पादनाची विश्वासार्हता यांचा विचार करून बेबी केअर उत्पादने निवडण्याकडे पालकांचा कल वाढत आहे. परंपरागत काळजी आणि आधुनिक पालकांच्या अपेक्षा यांचा समतोल साधण्याच्या उद्देशाने FromMaa रेंज सादर करण्यात आली आहे. आईच्या प्रेमातून मिळणारी सुरक्षिततेची भावना आणि आधुनिक बेबी केअरची गरज यांचा संगम या ब्रँडच्या संकल्पनेत करण्यात आला आहे. या लॉन्चबाबत ईमामी लिमिटेडच्या संचालक प्रीति ए. सुरेका म्हणाल्या, "'FromMaa' हे नावच प्रत्येक पिढीतील आईच्या भावनांचे प्रतिनिधित्व करते. बोरोप्लस FromMaaच्या माध्यमातून काळजी, संरक्षण आणि प्रेमळ संगोपन या आईच्या मूलभूत भावनांना आधुनिक फॉर्म्युलेशन, नैसर्गिक घटक आणि विश्वासार्हतेची जोड देणारी रेंज तयार करण्याचा आमचा प्रयत्न आहे. बोरोप्लसने अनेक दशकांपासून भारतीय कुटुंबांचा विश्वास संपादन केला आहे. FromMaaच्या माध्यमातून बेबी केअर श्रेणीत हा वारसा पुढे नेताना आम्हाला आनंद होत आहे." बोरोप्लस FromMaa रेंज विविध पॅक साइज आणि फॉरमॅटमध्ये प्रमुख ई-कॉमर्स प्लॅटफॉर्मवर उपलब्ध करण्यात आली आहे. या माध्यमातून देशभरातील पालकांपर्यंत ही नवीन बेबी केअर रेंज पोहोचवण्याचे कंपनीचे उद्दिष्ट आहे.

# 'बिर्ला ओपस पेंट्स'तर्फे महाराष्ट्रात गणेशोत्सवाच्या उत्साहाला सुरुवात

BIRLA opus
बाप्पाचा मान

पुणे (दै. संध्या) : आदित्य बिर्ला समूहाच्या 'ग्रासिम इंडस्ट्रीज'चा विभाग असलेल्या 'बिर्ला ओपस पेंट्स'ने गणेशोत्सवाच्या निमित्ताने 'बाप्पाचा मान' हा उपक्रम सुरू केला आहे. या अनोख्या उपक्रमाद्वारे महाराष्ट्रातील गृहनिर्माण सोसायट्यांना त्यांच्या सर्जनशीलतेचे, भक्तीभावाचे आणि उत्सवाच्या उत्साहाचे प्रदर्शन करण्याची संधी मिळणार आहे. या उपक्रमांतर्गत सहभागी सोसायट्यांचा विशेष सन्मानही केला जाईल. गणेशोत्सव लोकांना एकत्र आणतो आणि परिसरांना व गृहनिर्माण सोसायट्यांना उत्साही उत्सवाच्या केंद्रांमध्ये रूपांतरित करतो. गणेशोत्सवाच्या या सामुदायिक भावनेतून प्रेरित होऊन, 'बाप्पाचा मान' हा उपक्रम अशा गृहनिर्माण सोसायट्यांचा गौरव करेल, ज्यांचे पंडाल कलात्मक सर्जनशीलता, अद्वितीय मूर्ती आणि पर्यावरणपूरक पद्धतींच्या माध्यमातून एक अविस्मरणीय अनुभव देतात. 'बाप्पाचा मान' अंतर्गत, मुंबई, पुणे, नागपूर, नाशिक, कोल्हापूर आणि अमरावती येथील गृहनिर्माण संस्थांना त्यांच्या गणेश पंडालमध्ये 'भगवान गणेशाचे घर' तयार करण्यासाठी आणि रंगविण्यासाठी आमंत्रित केले जात आहे. ही स्पर्धा संपूर्ण महाराष्ट्रभर चालणार असून, महाराष्ट्राच्या सर्वात आवडत्या उत्सवाचे सौंदर्य, सर्जनशीलता आणि सामुदायिक भावनेचे प्रदर्शन करणार आहे.




# बझबॉल्झची महाराष्ट्रात एन्ट्री; पुण्यात उपलब्ध

■ पुणे (दै. संध्या)

रंगीत आणि सहज ओळखता येणाऱ्या गोल आकाराच्या पॅकेजिंगसह विविध हटके फ्लेवर्ससाठी प्रसिद्ध असलेले बझबॉल्झ हे रेडी-टू-ड्रिंक फ्लेवर्ड अल्कोहोलिक पेय आता महाराष्ट्रात दाखल झाले आहे. 'पॉप. सिप. बझ.' या संकल्पनेवर आधारित हे पेय सध्या पुण्यात उपलब्ध झाले असून, सप्टेंबरअखेरीस मुंबईतही उपलब्ध होणार आहे. भारतामध्ये डिसेंबर २०२५ मध्ये बंगळुरूमधून लॉन्च झाल्यानंतर मिळालेल्या प्रतिसादाच्या पार्श्वभूमीवर बझबॉल्झने मे २०२६ मध्ये गोव्यात प्रवेश केला. आता महाराष्ट्रातील पुणे आणि मुंबई या प्रमुख शहरांमध्ये विस्तार करत कंपनीने देशातील आपली उपस्थिती आणखी मजबूत केली आहे. बझबॉल्झचे प्रेसिडेंट जेस शीरहॉर्न म्हणाले, "भारतामध्ये बझबॉल्झला मिळालेला प्रतिसाद उत्साहवर्धक आहे. महाराष्ट्रात प्रवेश करण्यासाठी आम्ही विशेष उत्सुक होतो. भारतीय प्रौढ ग्राहकांना कॉकटेलचा वेगळा आणि सोयीस्कर अनुभव घेण्याची इच्छा असल्याचे आम्हाला दिसून येत आहे. पुण्यातील लॉन्चनंतर सप्टेंबरअखेरीस मुंबईतही बझबॉल्झ उपलब्ध होईल. महाराष्ट्रातील रिटेलर्स आणि वितरकांकडून मिळणारा उत्साह तसेच सोशल मीडियावरील ग्राहकांच्या प्रतिसादामुळे आम्हाला मोठे प्रोत्साहन मिळाले आहे." पुणे आणि मुंबईचा समावेश झाल्यानंतर एका वर्षापेक्षा कमी कालावधीत बझबॉल्झ तीन राज्यांतील चार शहरांमध्ये उपलब्ध झाला आहे. कंपनीच्या म्हणण्यानुसार, आकर्षक पॅकेजिंग, वेगळे फ्लेवर्स आणि सोयीस्कर आकार यामुळे ब्रँडला ग्राहकांकडून चांगला प्रतिसाद मिळत आहे. महाराष्ट्रात बझबॉल्झचे १८० मिलीचे गोल आकाराचे पॅक उपलब्ध असून, त्यात १५% अल्कोहोलचे प्रमाण (ABV) आहे. या उत्पादनाची किंमत १२५ रुपये आहे. भारतीय ग्राहकांच्या आवडी लक्षात घेऊन फ्लेवर्स विशेषतः भारतासाठी विकसित करण्यात आल्याचे कंपनीने सांगितले. बेरी लेमन स्क्वीझ – बेरी आणि लिंबाचा आंबट-तुरट व ताजेतवाना स्वाद. स्ट्रॉबेरी स्क्वीझ – स्ट्रॉबेरी आणि लिंबाची रसाळ चव. चिली ग्वावा ग्रूव्ह – पेरूच्या गोडव्याला मिरचीच्या तिखटपणाची जोड.

कार्यालय

## जिल्हा वक्फ अधिकारी, पुणे

कार्यालयाचा पत्ता : प्लॅटिनम बिल्डींग, पहिला मजला, प्लॉट नंबर ११, मंगळवार पेठ, सिंचन भवन शेजारी, पुणे ४११ ०११.

जा.क्र/जिवअ/पुणे/चौकशी/256/२०२६ दिनांक : 14 AUG 2026

(जाहीर प्रगटन)

उम्मीद अधिनियम १९९५ च्या कलम ६९ अन्वये वक्फ संस्थेच्या योग्य प्रशासनाकरीता योजना मंजूर करणेबाबत.

वक्फ संस्थेच नाव व पत्ता : Khalilpura Bepari Masjid, Vill. Junner, Tq. Junner, Dist. Pune (MSBW/PUN/654/2024)

उपरोक्त वक्फ संस्था महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळात नोंदणीकृत असुन अर्जदार श्री. अकील अहेमद गुलाम दस्तगीर कुरेशी यांनी दि. ०३/१०/२०२४ रोजीच्या अर्जान्वये सदर संस्थेच्या व्यवस्थापनाकरीता महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळाकडे प्रारुप योजना दाखल केलेली आहे. प्रारुप योजनेतील तरतूदीनुसार विश्वस्तांचा कार्यकाळ ५ वर्षांचा असून व्यवस्थापन समिती निवडीची रित राजीनामा, बडतर्फी, मृत्यू व अन्य कारणांमुळे पद रिक्त झाल्यास सदर रिक्त पदी उर्वरित व्यवस्थापकीय समिती सदस्यांच्या बहुमताने पद्धतीने नवीन सदस्यांची नियुक्ती करण्यात येईल अशी आहे. योजनेमध्ये नमूद प्रस्तावित व्यवस्थापन समिती खालीलप्रमाणे आहे:-

| अ. क्र. | नाव | पद |
|---|---|---|
| 1. | अकील अहेमद गुलाम दस्तगीर कुरेशी | अध्यक्ष |
| 2. | अबू सईद अब्दुल रशीद सौदागर | उपाध्यक्ष |
| 3. | महंमद मुर्तुझा अ रहेमान सौदागर | सचिव |
| 4. | कुरैशी मोहम्मद असगर मोहम्मद अकबर | स. सचिव |
| 5. | मोहम्मद नजर अकील अहमद कुरेशी | खजिनदार |
| 6. | अब्दुल नबी अब्दुल हाही चौधरी | कोषाध्यक्ष |
| 7. | मोहम्मदनुर गुलाममोहम्मद कुरेशी | सदस्य |
| 8. | इम्रान बशीर कुरेशी | सदस्य |
| 9. | अहमद अशरफ अब्दुल गफ्फार सौदागर | सदस्य |

सदर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ८ दिवसाच्या आत, जिल्हा वक्फ अधिकारी, पुणे, प्लॅटिनम बिल्डींग, पहिला मजला, प्लॉट नंबर ११, मंगळवार पेठ, सिंचन भवन शेजारी, पुणे ४११ ०११. येथे आपले म्हणणे दाखल करावे. विहीत वेळेनंतर आक्षेप प्राप्त झाल्यास त्याची दखल घेण्यात येणार नाही. याची दक्षता घ्यावी.

शिक्का

सही/-
जिल्हा वक्फ अधिकारी
(पुणे)

## पुणे महानगरपालिका, पुणे

निविदा प्रक्रिया कक्ष मलनि:सारण देखभाल व दुरूस्ती विभाग

निविदा जाहिरात - नविन कामे

विक्री कालावधी दिनांक : दि. ०९/०९/२०२६ १५:०० दुपारी ते १८/०९/२०२६ १५:०० दुपारी पर्यंत

स्विकृती दिनांक : दि. ०९/०९/२०२६ १५:०० दुपारी ते १८/०९/२०२६ १५:०० दुपारी पर्यंत

तांत्रिक निविदा उघडणे प्रक्रिया दिनांक : २१/०९/२०२६ १५.०० दुपारी

| निविदा क्रमांक | खात्याचे नाव | कामाचे नाव | निविदा संच किंमत रू. | अंदाजित पूर्व गणित रक्कम रू. | बयाणा रक्कम रू. | कामाची मुदत (महिने) | निविदा विषयक जबाबदार व्यक्तीचे नाव व दूरध्वनी क्रमांक |
|---|---|---|---|---|---|---|---|
| PMC/ DRAINAGE/2026/48 | मलनि:सारण देखभाल व दुरूस्ती | प्रभाग क्र. २२ मधील भगवा चौक पाठीमागे व गुलटेकडी परिसरात ड्रेनेज लाईन टाकणे व काँक्रीट करणे. | रु १३५९/- | रु ३४६७३३५/- | रु ३४६७३/- | ६ | संदीप नरहरी राजूरकर ९६८९९३९६०६ |
| PMC/ DRAINAGE/2026/49 | मलनि:सारण देखभाल व दुरूस्ती | प्रभाग क्र. २२ मधील दीपज्योत तरुण मंडळ ते काशेवाडी पोलीस चौकी पर्यंत मोठ्या व्यासाची लाईन टाकणे व दुरुस्ती विषयक कामे करणे | रु १३५९/- | रु २७६२९४९/- | रु २७६२९/- | ६ | संदीप नरहरी राजूरकर ९६८९९३९६०६ |
| PMC/ DRAINAGE/2026/50 | मलनि:सारण देखभाल व दुरूस्ती | झोन क्र. ३ मधील कार्यालय हद्दीतील मलवाहिन्या व पावसाळी वाहिन्या चॅम्पियन मशीनद्वारे सफाई करणे | रु ६०७९/- | रु ६९९८७८१/- | रु ६९९८८/- | १२ | रोहन शिवाजी दिवटे ९०९६५३९८९१ |
| PMC/ DRAINAGE/2026/51 | मलनि:सारण देखभाल व दुरूस्ती | झोन क्र ४ मधील मास्टर प्लान नुसार मांजरी येथील रंगीचा ओढा लगत ड्रेनेज लाईन विकसित करणे. | रु ६०७९/- | रु ४७८४१०८/- | रु ४७८४१/- | १२ | रुषिकेश विठ्ठल सूर्यवंशी ९८९०७५७४६१ |
| PMC/ DRAINAGE/2026/52 | मलनि:सारण देखभाल व दुरूस्ती | प्रभाग क्र. १५ मांजरी गाव रेल्वे गेट परिसरात १८ इंची ड्रेनेज टाकणे. | रु १३५९/- | रु २०७५८७७/- | रु २०७५९/- | ९ | रुषिकेश विठ्ठल सूर्यवंशी ९८९०७५७४६१ |
| PMC/ DRAINAGE/2026/53 | मलनि:सारण देखभाल व दुरूस्ती | प्रभाग क्र. १३ मध्ये कै. तुकारामशेठ वाहनतळ परिसरात मोठ्या व्यासाची ड्रेनेज लाईन टाकणे. | रु १३५९/- | रु ३४२८३९७/- | रु ३४२८४/- | १२ | आकाश आशोक देंगे ९०६७७६४७६७ |
| PMC/ DRAINAGE/2026/54 | मलनि:सारण देखभाल व दुरूस्ती | वनशिव वस्ती ते तळजाई पठार येथे मोठ्या व्यासाची ड्रेनेज लाईन टाकणे. | रु ६०७९/- | रु ४९२८९२८/- | रु ४९२८९/- | ६ | प्रशांत प्रदीप परदेशी ७७३८०८१७११ |
| PMC/ DRAINAGE/2026/55 | मलनि:सारण देखभाल व दुरूस्ती | ट्रेझर पार्क नाला ते दाते बसथांबा पर्यंत नाल्यातून मोठ्या व्यासाची ड्रेनेज लाईन विकसित करणे. | रु ६०७९/- | रु ४९५००८७/- | रु ४९५०१/- | ६ | प्रशांत प्रदीप परदेशी ७७३८०८१७११ |

अ) सदर कामाबाबत निविदा अटी/शर्ती इ. बाबतचा सर्व तपशिल निविदा संचामध्ये नमूद केला असून सदर कामांचे निविदा संच https://mahatenders.gov.in या वेबसाईटवर पाहण्यासाठी उपलब्ध आहे. निविदा संचाची विक्री व स्वीकृती सदर वेबसाईटवरून फक्त ऑनलाइन पद्धतीने करण्यात येत असून सर्व निविदा दोन पाकीट पद्धतीने मागविण्यात येत आहेत.

ब) निविदा प्रक्रियाच्या शेवटच्या दिवशी निविदा संच प्राप्त न झाल्यास स्वीकृतीच्या शेवटच्या दिवशी ऑनलाइन सादरीकरण न झाल्यास सर्वस्वी जबाबदारी टेंडरदाराची राहील.

क) ऑनलाईन निविदा प्रक्रीया बाबतची संपूर्ण माहिती टेंडर सेल विभाग पुणे म.न.पा. येथे मिळेल.

ड) कार्यालयीन आदेश क्र. अतिमआ (वि)/३२, दि.२२.०४.२०१६ नुसार बयाणा रक्कम ECS/RTGS/ NEFT सुविधेमार्फतच स्वीकारण्यात येणार आहे.

जाहिरात क्रमांक : २/७४९ दि. ०८/०९/२०२६

## थोडक्यात पण महत्वाचे



## आंतर महाविद्यालयीन टेबल टेनिस स्पर्धेत डीवायपीसीओइ, पीसीसीओईआर विजयी

**पिंपरी : दैनिक संध्या**

आंतर महाविद्यालयीन टेबल टेनिस मुले आणि मुलींच्या स्पर्धेचे आयोजन पीसीसीओईआर येथे करण्यात आले होते. या स्पर्धेत मुलांच्या गटात आकुर्डी येथील डॉ. डी. वाय. पाटील कॉलेज ऑफ इंजीनियरिंग या संघाने ताथवडे येथील इंदिरा कॉलेज संघाचा पराभव करत विजय मिळवला. मुलींच्या स्पर्धेत रावेत येथील पीसीसीओईआर संघाने आकुर्डी येथील पीसीसीओई संघाचा पराभव करत विजेतेपद पटकावले. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे जिल्हा विभागीय क्रीडा समिती आणि रावेत येथील पीसीसीओईआर यांच्या संयुक्त विद्यमाने या स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. तत्पूर्वी झालेल्या मुलांच्या उपांत्य सामन्यांमध्ये डॉ. डीवाय पाटील कॉलेज ऑफ इंजीनियरिंग संघाने राजश्री शाहू अभियांत्रिकी महाविद्यालय संघाचा व इंदिरा कॉलेज ऑफ कॉमर्स अँड सायन्स, ताथवडे संघाने पीसीसीओई संघाचा पराभव करत अंतिम फेरीत प्रवेश मिळविला. मुलींच्या स्पर्धेत रावेत येथील पीसीसीओईआर संघाने पिंपरी येथील डॉ. डी. वाय. पाटील कला, वाणिज्य, विज्ञान महाविद्यालय संघ आणि पीसीसीओई, सासवड येथील पीडीइए कॉलेज ऑफ फार्मसी संघाचा पराभव करत अंतिम फेरीत प्रवेश केला. मुलांच्या स्पर्धेमध्ये पुणे जिल्ह्यातील एकूण १८ विविध महाविद्यालयांचे संघ तसेच मुलींच्या स्पर्धेत एकूण ८ विविध महाविद्यालयांचे संघ सहभागी झाले.स्पर्धेचे उद्‌घाटन पीसीसीओईआरचे संचालक प्राचार्य डॉ. हरीश तिवारी, पुणे जिल्हा विभागीय क्रीडा समितीचे सह सचिव डॉ. अक्षय काशीद, डॉ. गणेश चव्हाण यांच्या हस्ते करण्यात आले होते. स्पर्धेचे पारितोषिक वितरण पीसीसीओईआरचे संचालक प्राचार्य डॉ. हरीश तिवारी, पुणे जिल्हा विभागीय क्रीडा समितीचे सहसचिव डॉ. गणेश चव्हाण, निवड समितीचे अध्यक्ष डॉ. अनिल कमलापुरे यांच्या हस्ते करण्यात आले. स्पर्धेचे आयोजन पीसीसीओईआरचे शारीरिक शिक्षण संचालक प्रा. मिलिंद थोरात यांनी केले. यशस्वी संघांचे पीसीईटीचे अध्यक्ष ज्ञानेश्वर लांडगे, उपाध्यक्ष पद्माताई भोसले, सचिव विठ्ठल काळभोर, खजिनदार शांताराम गराडे, विश्वस्त हर्षवर्धन पाटील, उद्योजक नरेंद्र लांडगे, अजिंक्य काळभोर, कार्यकारी संचालक डॉ. गिरीश देसाई यांनी अभिनंदन केले.

## निगडी ते लोणावळा मेट्रो मार्गासाठी DPR तयार करण्याची मनसेची मागणी

**पिंपरी : दैनिक संध्या**

निगडी (भक्ती-शक्ती) ते लोणावळा या प्रस्तावित मेट्रो मार्गाचा सविस्तर प्रकल्प अहवाल (DPR) तयार करून आगामी नियोजनात या मार्गाचा समावेश करावा, अशी मागणी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे शहराध्यक्ष सचिन चिखले यांनी महामेट्रोचे व्यवस्थापकीय संचालक श्रावण हर्डीकर यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे. चिखले यांनी दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, पुणे आणि पिंपरी-चिंचवड शहराला लागून असलेल्या मावळ तालुक्यातील लाखो नागरिकांचे दैनंदिन दळणवळण पुणे व पिंपरी-चिंचवडशी जोडलेले आहे. सध्या पिंपरी ते निगडी (भक्ती-शक्ती) मेट्रो मार्गाचे काम वेगाने सुरू असून, भविष्यात मेट्रोचा विस्तार मावळ भागापर्यंत करणे आवश्यक असल्याचे त्यांनी नमूद केले आहे. मावळ परिसरात अनेक महाविद्यालये, विद्यापीठे आणि औद्योगिक कंपन्या कार्यरत आहेत. तसेच राज्य सरकारने मावळ भागात नवीन MIDC उभारण्याची घोषणा केल्यामुळे भविष्यात या परिसरातील प्रवासी संख्या आणखी वाढण्याची शक्यता आहे. देहूरोड, तळेगाव, वडगाव, कामशेत आणि लोणावळा या पट्ट्यात वाढती लोकसंख्या आणि औद्योगिक विकास लक्षात घेता आधुनिक सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेची गरज निर्माण झाली आहे. या पार्श्वभूमीवर निगडी (भक्ती-शक्ती) ते लोणावळा मेट्रो मार्गाचा समावेश आगामी बजेटमध्ये करून लवकरात लवकर DPR तयार करण्याची मागणी मनसेने केली आहे. या मेट्रो मार्गामुळे विद्यार्थी, कामगार, नोकरदार आणि व्यावसायिकांना मोठा दिलासा मिळेल तसेच पुणे, पिंपरी-चिंचवड आणि मावळ परिसरातील वाहतूक व्यवस्थेला चालना मिळेल, असा विश्वास मनसेकडून व्यक्त करण्यात आला आहे.

## भंडारा डोंगरावर सापडले दीड वर्षीय बाळ; आई-वडिलांचा शोध सुरू

**पिंपरी : दैनिक संध्या**

देहू येथील भंडारा डोंगर परिसरात एक दीड वर्षीय गोंडस चिमुकले बाळ सापडल्याची हृदयस्पर्शी घटना समोर आली आहे. बाळाला स्वतःचे नाव, घराचा पत्ता किंवा कोणतीही माहिती सांगता येत नसल्याने त्याच्या आई-वडिलांचा शोध घेण्यासाठी प्रशासन आणि पोलीस यंत्रणा प्रयत्नशील आहेत. सध्या या बाळाला पिंपरी चिंचवड महापालिकेच्या वायसीएम रुग्णालयात सुरक्षित ठेवण्यात आले आहे. येथे महिला पोलीस कर्मचारी राणी राऊत या बाळाची अगदी आईप्रमाणे काळजी घेत आहेत. बाळाला जेवण भरवणे, त्याची वैद्यकीय तपासणी करून घेणे तसेच आवश्यक ती सर्व काळजी घेण्याची जबाबदारी त्या पार पाडत आहेत. मात्र, हा सांभाळ तात्पुरता असून या चिमुकल्याला त्याच्या आई-वडिलांपर्यंत सुखरूप पोहोचवणे हेच सर्वांचे प्रमुख उद्दिष्ट आहे. यासाठी पोलीस आणि संबंधित यंत्रणा विविध माध्यमांतून पालकांचा शोध घेत आहेत. नागरिकांनीही या घटनेकडे केवळ एक बातमी म्हणून न पाहता, या बाळाची माहिती आणि व्हिडीओ जास्तीत जास्त लोकांपर्यंत पोहोचवावा, असे आवाहन करण्यात येत आहे. कदाचित तुमच्या एका शेअरमुळे या चिमुकल्याचा आपल्या कुटुंबाशी पुन्हा मिलाप होऊ शकतो. या बाळाबाबत कोणाकडेही माहिती असल्यास त्यांनी तात्काळ जवळच्या पोलीस ठाण्याशी किंवा संबंधित अधिकाऱ्यांशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.



# महर्षी दयानंद सरस्वती यांनी मानवाच्या कल्याणाचा मार्ग सांगितला - वेदपालजी आर्य

■ पिंपरी (दै. संध्या)

माणसाचा सन्मान त्याच्या जन्म जाती वरून ठरवला जाऊ नये. क्षुद्र व्यक्तींना देखील वेद वाचता आले पाहिजे, समजले पाहिजे यासाठी थोर समाज सुधारक महात्मा जोतीराव फुले आणि मागासवर्गीय नागरिकांच्या मागणीवरून पुण्यात मोमीनपुरा येथे १८७५ साली महर्षी दयानंद सरस्वती यांनी व्याख्यान दिले. एकूण ३५ व्याख्यानातून त्यांनी मानवाच्या कल्याणाचा मार्ग सांगितला असे वेदपालजी आर्य यांनी सांगितले.

महर्षी दयानंद सरस्वती पुणे प्रवास प्रवचने १५१ वा स्मृती समारंभ निमित्त महाराष्ट्र आर्य प्रतिनिधी सभा, पिंपरी, पुणे, नाना पेठ, वारजे, खडकी, आळंदी व चिंचवड आर्य समाजाच्या संयुक्त विद्यमाने पिंपरी आर्य समाज भवन येथे रविवारी, (दि. ६ सप्टेंबर) आयोजित केलेल्या कार्यक्रमात वेदपालजी बोलत होते. यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष तथा पिंपरी आर्य समाज प्रधान सुरेंद्र करमचंदानी, सार्वदेशिक आर्य प्रतिनिधी सभा दिल्लीचे महामंत्री ॲड. प्रकाश आर्य, आर्य प्रतिनिधी सभा दिल्ली महामंत्री विनय आर्य, राजस्थान येथील वैदिक विद्वान आचार्य कर्मवीर मेधार्थी, नर्मदापुरम मध्य प्रदेश येथील ऋतूस्पती आर्य, प्रमोद तिवारी, प्रमोद मिश्रा, बाळकृष्ण भिडे यांच्या वंशज छाया बर्वे भिडे, ॲड. गंगाराम भाऊ म्हस्के यांचे वंशज राजेंद्र म्हस्के, समन्वयक प्रा. साईनाथ पुण्णे आदीं उपस्थित होते. यावेळी उपस्थितांच्या हस्ते महर्षी दयानंद सरस्वती यांनी पुण्यात दिलेल्या प्रवचनातील १५ व्याख्यानांचा समावेश असलेल्या "प्रबोधन काळातील पुणे प्रवचन" या ग्रंथाच्या द्वितीय आवृत्तीचे प्रकाशन करण्यात आले. तसेच छाया बर्वे भिडे, राजेंद्र म्हस्के, प्रा. साईनाथ पुण्णे यांचा गौरव करण्यात आला.

कर्मवीर मेधार्थी यांनी सांगितले की, १७५ वर्षांपूर्वी पुण्यामध्ये महर्षी दयानंद सरस्वती यांच्या व्याख्यानाचा आणि मिरवणुकीचा विरोध करण्यात आला होता. आज त्याच पुण्यातील ऐतिहासिक म्हस्के वाडा ते भिडे वाडा दरम्यान झालेल्या मिरवणुकीत पुणेकर नागरिकांनी पुष्पवृष्टी केली, या विचार परिवर्तनाला १५१ वर्ष जावी लागली.

ऋतूस्पती आर्य यांनी सांगितले की, आजच्या भ्रमिष्ट झालेल्या तरुण पिढीला महर्षी दयानंद सरस्वती यांचे विचार मार्गदर्शक ठरतील. महर्षींनी सती प्रथेला



विरोध करीत महिलांना सन्मान दिला. वेद पठण साठी भेदभाव नाकारून सर्वांसाठी गुरुकुल स्थापन करून महिलांना देखील वेद पठण मुक्त केले.

महामंत्री विनय आर्य यांनी सांगितले की, न्यायमूर्ती महादेव गोविंद रानडे, थोर समाज सुधारक महात्मा जोतीराव फुले, उद्योगपती नाना जगन्नाथ शंकर शेठ आणि पुण्यातील शेकडो विद्वानांच्या उपस्थितीमध्ये आणि मोमीनपुरा येथील मागासवर्गीय वस्तीमध्ये वेदांवर व्याख्यान देण्याचे धाडस महर्षी दयानंद सरस्वती यांनी केले. युवा पिढीने भारताचा हा गौरवशाली इतिहास अभ्यासावा आणि महर्षी दयानंद यांच्या विचारांचा प्रचार करावा असे आवाहन केले.

ॲड. प्रकाश आर्य यांनी सांगितले की, समाजातील जातीभेद भाव नष्ट करणे हा स्वामींचा उद्देश होता. स्वामीं सारखा दुसरा गुरु होणे नाही. मनोरंजन विश्वात भरकटत जाणाऱ्या भौतिक सुख प्राप्तीच्या मागे लागलेल्या युवा पिढीला योग्य दिशा देण्याचे काम आर्य समाज प्रतिनिधींनी करावे असे आवाहन केले. दिल्ली आर्य समाज सभेचे प्रधान सुरेंद्रकुमार आर्य यांच्या शुभ संदेशाचे वाचन दीप्ती विद्यार्थी यांनी केले.

पिंपरीतील या मुख्य समारंभा पूर्वी सकाळी प्रसिद्ध विधीज्ञ ॲड. गंगारामभाऊ म्हस्के यांच्या पुणे कॅम्प येथील वाड्यापासून बुधवार पेठ तांबडी जोगेश्वरी येथील भिडे वाड्यापर्यंत भव्य शोभायात्रा काढण्यात आली होती. समारंभाच्या आयोजनात उत्तम दंडीमे, दिनेश यादव, दिगंबर रिद्धीवाडे, संजीव भाट, ज्ञानेश्वर राणे, वैशाली यादव आदींनी सहभाग घेतला होता.

स्वागत पिंपरी आर्य समाज प्रधान सुरेंद्र करमचंदानी, सूत्रसंचालन नलिनी देशपांडे दीप्ती विद्यार्थी यांनी केले आणि आभार प्रा. साईनाथ पुण्णे यांनी मानले.



# संस्कारक्षम पिढी घडविण्याचे काम शिक्षकांचे - नंदकुमार सातुर्डेकर

■ पिंपरी (दै. संध्या)

देशाची सद्यस्थिती पाहता राजकारण्यांचे तरुणांच्या समस्यांकडे लक्ष नाही. शिक्षण क्षेत्रात अनागोंदी वाढली आहे. प्रवेशाबाबत अडचणी, नीट सारख्या परीक्षांचा घोळ या सर्व अडचणीतून शिक्षण घेऊन पुढे बेरोजगारीचे संकट, बोकाळलेला भ्रष्टाचार यामुळे तरुण वर्ग नैराश्या मुळे व्यसनाच्या आहारी जात आहे. काही आत्महत्या करत आहेत. यातून तरुणांना बाहेर काढण्यासाठी संस्कारांची गरज आहे हे काम शिक्षकच करू शकतील असे प्रतिपादन ज्येष्ठ पत्रकार नंदकुमार सातुर्डेकर यांनी येथे केले.

मराठवाडा प्रतिष्ठान पिंपरी चिंचवड या संस्थेच्या देवगिरी इंग्लिश मीडियम स्कूल आणि मातोश्री प्राथमिक विद्यामंदिर (चिखली) या शाळेतील शिक्षकांचा शिक्षक दिनानिमित्त ज्येष्ठ पत्रकार नंदकुमार सातुर्डेकर यांच्या हस्ते शाल, श्रीफळ, पुष्पगुच्छ व स्मृति चिन्ह देऊन सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमास प्रतिष्ठानचे अध्यक्ष माजी नगरसेवक कुमार जाधव, उपाध्यक्ष उत्तम दंडीमे, लक्ष्मण लिंबापुरे, संचालिका स्मिता जाधव, प्रीती शिंदे, पूजा जाधव, प्राचार्य शहिदा सय्यद आदी उपस्थित होते.

यावेळी सातुर्डेकर म्हणाले की, भारतीय संस्कृतीत कृतज्ञता महत्त्वाची आहे. आपल्या संस्कृतीत गुरूला मोठे स्थान आहे. मातृ देवो भव, पितृ देवो भव, आचार्य देवो भव असे म्हटले जाते. जीवनाची परिपक्वता म्हणजे शिक्षण असे स्वामी विवेकानंदांनी म्हटले होते. ही परिपक्वता शिष्या मध्ये येण्यासाठी जे कष्ट घेतात ते खऱ्या अर्थाने गुरु होत. आपल्याकडे ऋषी मुनींच्या काळात गुरुकुल पद्धती द्वारा हा प्रयत्न खऱ्या अर्थाने झाला. मात्र कालानुरूप सगळे बदलले आहे. विद्यार्थी संख्या वाढल्याने विद्यार्थ्यांची नावे सुद्धा शिक्षकांना आठवत नाहीत अशी परिस्थिती आहे. बऱ्याच घरात आई वडील दोघेही नोकरीस असल्याने त्यांना मुलांकडे लक्ष द्यायला वेळ नाही. म्हणूनच शिक्षकांकडे आशेने पाहिले जाते. आजही सर्वात प्रामाणिक घटक म्हणून शिक्षकालाच मान्यता आहे म्हणूनच साक्षरतेचे काम असो कुटुंब नियोजनाचा प्रसार असो की मतदार याद्यांचे काम असो या सरकारला शिक्षकच आठवतात मात्र शिक्षकेतर कामांचा बोजा शिक्षकांवर लादला जात असल्याने त्यांची कार्यक्षमता कमी होत आहे. असे सातुर्डेकर म्हणाले.

यावेळी संस्थेचे अध्यक्ष कुमार जाधव, उपाध्यक्ष उत्तम दंडीमे, संचालिका प्रीती शिंदे, प्राचार्य शहिदा सय्यद, तसेच कीर्ती दुरुगकर, मालन गाडीलकर, वर्षाली चेंगे, सबीना सय्यद, आरती खोडसुरे या शिक्षिकांनी आपले मनोगत व्यक्त केले. सूत्रसंचालन शितल तुपे व तेजना गिरमे यांनी केले.

## शिक्षक दिनानिमित्त रंगले कविसंमेलन; काव्यमयी वातावरणात शिक्षकांच्या प्रतिभेचा जागर!

■ पिंपरी (दै. संध्या)

महाराष्ट्र साहित्य परिषद, पिंपरी - चिंचवड शाखेच्या वतीने शिक्षक दिनाचे औचित्य साधून आयोजित करण्यात आलेले 'शिक्षक कविसंमेलन' अत्यंत उत्साहात आणि काव्यमयी वातावरणात संपन्न झाले. कवयित्री शांता शेळके सभागृह, संत तुकाराम संकुल, निगडी प्राधिकरण येथे संपन्न झालेल्या या संमेलनात विविध शाळा - महाविद्यालयांतील शिक्षक कवींनी आपल्या बहारदार रचना सादर करत साहित्यरसिकांची मने जिंकली. कार्यक्रमाला महात्मा फुले महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. पांडुरंग भोसले, बाबा भारती प्रतिष्ठानचे अध्यक्ष महेंद्र भारती, राजन लाखे, डॉ. रजनी शेठ, डॉ. संजय जगताप यांची प्रमुख उपस्थिती लाभली होती. मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून कार्यक्रमाचा प्रारंभ करण्यात आला. कविसंमेलनात कवी अशोक सोनवणे, प्रतिमा काळे, प्रा. महादेव रोकडे, जयश्री श्रीखंडे, अनुप्रिया प्रभू, ऐश्वर्या गर्जे, श्रावणी फुलझलके आदी कवींनी शिक्षणपद्धती, निसर्ग, सामाजिक वास्तव, मातृत्व आणि शिक्षक जीवनातील विविध अनुभवांवर आधारित कवितांचे प्रभावी सादरीकरण केले. काही रचनांनी उपस्थितांच्या डोळ्यांत अश्रू उभे केले, तर काही हास्यकवितांनी सभागृहात खसखस पिकवली. रसिकांनी प्रत्येक कवितेला टाळ्यांच्या गजरात दाद दिली.

याप्रसंगी डॉ. पांडुरंग भोसले यांनी समाजात आणि शिक्षण क्षेत्रात शिक्षकांच्या योगदानाचे विविध दाखले देत भारतीय संस्कृतीत शिक्षकांचे योगदान उत्युच्च असल्याचे प्रतिपादन केले; तर महेंद्र भारती यांनी आपल्या मनोगतातून ब्रिटिश काळापासून सुरू झालेली औपचारिक शिक्षणाची पद्धत आणि लोकमान्य टिळक, महात्मा जोतिबा फुले, सावित्रीबाई फुले, महात्मा गांधी, रवींद्रनाथ टागोर, आगरकर, गोखले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, शाहूमहाराज, भांडारकर, डॉ. राधाकृष्णन, कर्मवीर भाऊराव पाटील अशा भारतीय विचारवंतांनी आणि शिक्षण क्षेत्रातील धुरिणांनी समाजाला घडविण्यात दिलेले योगदान याविषयी सविस्तर ऊहापोह करून तळागाळातील माणूस शिक्षणाच्या माध्यमातून केंद्रस्थानी यावा, अशी अपेक्षा व्यक्त केली.




# हिंदुस्थान अँटिबायोटिक्सच्या रियुनियनमध्ये रंगला गुरु-शिष्य स्नेहसोहळा

■ पिंपरी (दै. संध्या)

शाळा सुटली, वर्ग बदलले, प्रत्येक जण आपापल्या आयुष्यात रमला; मात्र शाळेच्या आठवणी आणि मैत्रीची नाळ आजही तितकीच घट्ट आहे. याच जिव्हाळ्याचा अनुभव हिंदुस्थान अँटिबायोटिक्स स्कूलच्या २००३ इंग्लिश मीडियम बॅचच्या रियुनियनमध्ये आला. डेक्कन एज्युकेशन सोसायटी संचालित हिंदुस्थान अँटिबायोटिक्स स्कूलच्या माजी विद्यार्थ्यांचा हा स्नेहमेळावा रविवार, दि. ६ सप्टेंबर २०२६ रोजी श्री कृष्ण पॅलेस हॉटेल येथे मोठ्या उत्साहात पार पडला.

या कार्यक्रमाला विद्यार्थ्यांच्या आग्रहाला मान देत शिक्षक ॲड.आशुतोष रानडे, रमेश गाढवे, अनिथा कदम (स्टीवन मिस) आणि कविता गायकवाड, मुकेश पवार आवर्जून उपस्थित राहिले. अनेक वर्षांनंतर शिक्षक आणि विद्यार्थी पुन्हा एकत्र आल्याने वातावरण भावनिक झाले. शिक्षकांनी आपल्या जुन्या आठवणींना उजाळा देत विद्यार्थ्यांशी मनमोकळा संवाद साधला आणि मनोगत व्यक्त केले.

'गुरुंचे ऋण कधीही फेडता येत नाही' या भावनेतून माजी विद्यार्थ्यांनी आपल्या शिक्षकांप्रती कृतज्ञता व्यक्त केली. शाळेने दिलेले शिक्षण, संस्कार आणि आयुष्याला दिशा देणारे मार्गदर्शन याबद्दल विद्यार्थ्यांनी




विद्यालयाची तसेच शिक्षकांची मनापासून प्रशंसा केली. कार्यक्रमाच्या वेळी विद्यालयातील दिवंगत शिक्षक, कर्मचारी आणि दिवंगत माजी विद्यार्थ्यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. त्यांच्या स्मृतींना उजाळा देत सर्वांनी शोक व्यक्त केला. त्यानंतर माजी विद्यार्थ्यांनी एकत्रितपणे श्लोक म्हणत आपल्या गुरुजनांना मानवंदना दिली.

रियुनियनच्या निमित्ताने माजी विद्यार्थ्यांनी विविध खेळांचे नियोजन केले होते. संगीत, मनोरंजन आणि हास्य-विनोदाने कार्यक्रमाला रंगत आणली. जुन्या मित्र-मैत्रिणींच्या भेटीने शालेय जीवनातील खोड्या, गमती-जमती आणि अविस्मरणीय प्रसंगांच्या आठवणी पुन्हा ताज्या झाल्या.

शिक्षक आणि माजी विद्यार्थ्यांनी एकत्रित स्नेहभोजनाचा आस्वाद घेतला. अनेक वर्षांनंतर एकत्र आलेल्या या मित्रपरिवाराने शाळेच्या आठवणींमध्ये रमून एकमेकांसोबत आनंदाचे क्षण अनुभवले.

'शाळा म्हणजे केवळ चार भिंती नव्हेत, तर आयुष्यभर सोबत राहणाऱ्या आठवणी, संस्कार आणि नाती आहेत,' याची प्रचिती या रियुनियनमधून आली. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अमीन अझीझ आणि दिपाली दंदाडे यांनी केले आणि प्राजक्त घोरपडे यांनी आभार व्यक्त केले.

कार्यक्रमाच्या शेवटी सर्व माजी विद्यार्थ्यांनी शिक्षक आणि विद्यालयाप्रती कृतज्ञता व्यक्त करत अशाच प्रकारे भविष्यातही स्नेहबंध कायम ठेवण्याचा संकल्प केला.तसेच सर्वांना आकर्षक भेटवस्तू देऊन कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

या अविस्मरणीय रियुनियनचे आयोजन प्राजक्त घोरपडे, विक्रांत वर्मा, अमीन अझीझ,दिपाली दंदाडे, गझलनाझ अल्फोन्स यांनी केले. त्यांच्या नियोजनामुळे हिंदुस्तान अँटिबायोटिक स्कूलच्या २००३(इंग्रजी माध्यम) बॅचचा हा स्नेहमेळावा माजी विद्यार्थ्यांसाठी आठवणींच्या कप्प्यात कायमचा जपून ठेवावा असा ठरला.



# अनाथ मुलांना कपडे, धावण्याच्या स्पर्धेचे आयोजन

## मनसे, सगनभाऊ दहीहंडी मंडळाचा उपक्रम

■ जेजुरी (दै. संध्या)

तीर्थक्षेत्र जेजुरी नगरीतील तीन दहीहंड्या बारामतीच्या गोविंदा पथकांनी फोडल्या. तर महाराष्ट्र नवनिर्माण सेना, शाहीर सगनभाऊ दहीहंडी उत्सव मंडळाच्या वतीने शालेय विद्यार्थ्यांच्या (मॅरेथॉन) धावण्याच्या स्पर्धेचे आयोजन, अनाथ मुलांना कपडे, शालेय साहित्य व किराणा माल आदी मदत करत दही हंडी उत्सव साजरा करण्यात आला .यावेळी विविध क्षेत्रातील मान्यवरांना सन्मानित करण्यात आले.

शनिवारी (दि.५) सुमारे ५कि. मि.,व ३कि.मि.मॅरेथॉन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते यामध्ये सुमारे३००विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला विविध महाविद्यालयातील २५विजेत्यांना पारितोषिक प्रदान करण्यात आली. सायंकाळच्या सुमारास डॉ.बाबासाहेब आंबेडकर चौकात महाराष्ट्र नवनिर्माण सेना, शाहीर सगनभाऊ दहीहंडी उत्सव मंडळाच्या वतीने आयोजित केलेली दहीहंडी बारामतीच्या उमाजीराजे नाईक दहीहंडी संघाने फोडली. यावेळी राऊतवाडी (वीर) येथील आस्तित्व गुरुकुल मधील सुमारे ५० अनाथ मुलांना नवी कपडे, शालेय साहित्य, तसेच जीवनावश्यक वस्तूंची मदत करण्यात आली नगरपालिका कर्मचारी राजेश गाढवे, बाळासाहेब खोमणे, सामाजिक कार्यकर्ते पाणीदूत आरोग्यदूत नवनाथ चौंडकर यांना सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले यावेळी उपनगराध्यक्ष गणेश निकुडे, देवसंस्थान विश्वस्त पोपट खोमणे, मंगेश घोणे, नगरसेवक स्वप्नील हरपळे, अभिजित कुदळे, परशुराम लाखे, नारायण जाधव, अशोक खोमणे, संभाजी ब्रिगेड चे संदीप जगताप आदी उपस्थित होते कार्यक्रमाचे आयोजन मनसे तालुकाध्यक्ष उमेश जगताप, गणेश कुंभार, सचिन नरोडे, आरती नरोडे, श्रीयश जगताप, सगनभाऊ मंडळाचे अध्यक्ष अमोल कुदळे आदींनी केले. मुख्य छत्रपती शिवाजी महाराज चौकात शिवसेवा प्रतिष्ठानचे अध्यक्ष तथा शिवसेना (उद्धव ठाकरे गट) किरण दावलकर आयोजित दहीहंडी बारामतीच्या गोविंदा पथकाने फोडली.

# उरुळी कांचन येथे उमाजी नाईक यांची जयंती उत्साहात साजरी

■ उरुळी कांचन (दै. संध्या)

उरुळी कांचन (ता. हवेली) येथे स्वातंत्र्यसंग्रामातील धाडसी क्रांतिकारक आणि आद्य स्वातंत्र्यवीर उमाजी नाईक यांची जयंती उरुळी कांचन ग्रामपंतायत येथे मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी उमाजी नाईक यांच्या प्रतिमेचे पूजन करून त्यांना अभिवादन करण्यात आले.

उमाजी नाईक यांनी ब्रिटिश सत्तेविरुद्ध दिलेला लढा, त्यांचे शौर्य, स्वाभिमान आणि समाजासाठी केलेले कार्य यांची उपस्थितांनी आठवण करून दिली. त्यांच्या जीवनकार्याचा आदर्श आजच्या तरुण पिढीने घ्यावा, तसेच समाजातील एकोपा, सामाजिक बांधिलकी आणि देशप्रेमाची भावना अधिक बळकट करावी, असे मत यावेळी उपस्थित मान्यवरांनी व्यक्त केले.

जयंतीनिमित्त परिसरात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले होते. कार्यक्रमस्थळी उमाजी नाईक यांच्या कार्याची माहिती देणारे फलक लावण्यात आले होते. नागरिक, युवक, महिला तसेच विविध सामाजिक संघटनांचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

यावेळी उमाजी नाईक यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. त्यांच्या शौर्याचा आणि त्यागाचा जयघोष करण्यात आला. तसेच सामाजिक



एकता आणि समाजहितासाठी कार्य करण्याचा संकल्प उपस्थितांनी केला.

उमाजी नाईक यांचा संघर्ष हा केवळ इतिहासाचा भाग नसून अन्यायाविरुद्ध लढण्याची प्रेरणा देणारा आहे. त्यांच्या विचारांचा आणि कार्याचा वारसा पुढील पिढीपर्यंत पोहोचविण्यासाठी अशा जयंती उत्सवांचे आयोजन महत्त्वाचे असल्याचेही यावेळी सांगण्यात आले.

कार्यक्रमाच्या निमित्ताने उरुळी कांचन परिसरातील नागरिकांमध्ये मोठा उत्साह पाहायला मिळाला. पारंपरिक वेशभूषेत युवकांची उपस्थिती, घोषणांनी आणि अभिवादनाने परिसरात उत्सवी वातावरण निर्माण झाले होते. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी आयोजक, पदाधिकारी, कार्यकर्ते आणि नागरिकांनी परिश्रम घेतले.

या कार्यक्रमाला काँग्रेस पक्षाचे ज्येष्ठ नेते देविदास भन्साळी, संचालक यशवंत सहकारी साखर कारखाना संतोष आबासो कांचन, सरपंच मिलिंद जगताप, माजी सरपंच दत्तात्रय कांचन, माजी उपसरपंच युवराज कांचन, भाऊसाहेब तुपे, तसेच चंद्रकांत खोमणे, सतीश साळवे लक्ष्मण खोमणे, सतीश खोमणे, ग्रामस्थ, ग्रामपंचायत कर्मचारी, आदी पदाधिकारी उपस्थित होते.

## थोडक्यात पण महत्वाचे



### जेजुरीत बल्लाळेश्वर मंदिरात पूजा -अभिषेक महाप्रसाद

**जेजुरी : दैनिक संध्या**

तीर्थक्षेत्र जेजुरी येथील ऐतिहासिक बल्लाळेश्वर मंदिरात श्रावण मासातील अखेरच्या सोमवार निमित्त विधिवत पूजा अभिषेक प्रवचन, कीर्तन आदी धार्मिक विधींसह महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते पंचक्रोशीतील सुमारे पाच हजार भाविकांनी शिवलिंगाचे देवदर्शन घेत महाप्रसादाचा लाभ घेतला. बल्लाळेश्वर विकास प्रतिष्ठानचे संस्थापक ह.भ.प.नारायण जगताप, अध्यक्ष मोहन भोसले, नगरसेवक शिवाजी जगताप, कात्रज दूध संघाचे संचालक तानाजी जगताप आदींनी धार्मिक विधी व महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते. जेजुरी गडकोटाच्या दक्षिण -पूर्व दिशेला जयाद्री डोंगर रांगेच्या पायथ्याशी जुनी जेजुरी वसाहत असून या लगतच सन.१७३२ ते १७३६ दरम्यान श्रीमंत बाजीराव पेशवे यांनी सुमारे ३६ एकर जागेत या तलावाची निर्मिती केली असून हे काम सुरू असताना स्वयंभू शिवलिंग आढळून आले तलावालगत या शिवलिंगाची स्थापना करण्यात आली .स्वराज्याचे पहिले पेशवे बाळाजी विश्वनाथ बल्लाळ यांच्या नावे हे मंदिर प्रचलित झाले .दगडी बांधकाम असलेल्या या शिवमंदिरात भूमिगत दगडी जलवाहिनी असून यातूनकोणत्याही यंत्रशिवाय सायफन पद्धतीने शेती सिंचनासाठी या पाण्याचा उपयोग करता येतो. स्थापत्य शास्त्राचा उत्कृष्ट नमुना असलेले हे शिवलिंग व मंदिर पुरातत्व खात्याने संरक्षित केले आहे.

### अनेकान्त इंग्लिश मीडियम स्कूलमध्ये ‘शिक्षक दिन’ उत्साहात संपन्न

**बारामती : दैनिक संध्या**

येथील ‘अनेकान्त इंग्लिश मीडियम स्कूल’मध्ये ‘शिक्षक दिन’ अत्यंत उत्साही आणि चैतन्यमय वातावरणात साजरा करण्यात आला. डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या जयंतीनिमित्त आयोजित या विशेष कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी शिक्षकांप्रति कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी विविध उपक्रमांचे आयोजन केले होते. शाळेतील विद्यार्थ्यांनी शिक्षकांची भूमिका वठवत विविध वर्गांमध्ये अध्यापनाचा अनुभव घेतला. या उपक्रमातून विद्यार्थ्यांना शिक्षकांच्या कामाचे महत्त्व आणि वर्ग व्यवस्थापनाचा अनुभव मिळाला. विद्यार्थ्यांनी शिक्षकांना गुलाबपुष्प, ग्रीटिंग कार्ड आणि भेटवस्तू देऊन त्यांचा यथोचित सन्मान केला. शिक्षक दिनानिमित्त विद्यार्थ्यांनी शिक्षकांसाठी विशेष सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन केले होते. त्याचबरोबर विविध खेळांचा समावेश होता. संपूर्ण दिवस आनंददायी आणि संस्मरणीय वातावरणात पार पडला.



# संगणक युग क्रांतीमुळे लिखित माध्यमांना छेद - युवराज मोहिते यांचे प्रतिपादन

■ चाकण (दै. संध्या)

लिखित माध्यमांना छेद देण्याची भूमिका संगणक युग क्रांतीमुळे घडली, असे विचार लेखक युवराज मोहिते यांनी येथे व्यक्त केले. चाकण महाविद्यालयात योद्धा शेतकरी युगात्मा शरद जोशी वैचारिक व्याख्यानमालेत मार्गदर्शन करताना मोहिते बोलत होते. याप्रसंगी चाकण शिक्षण मंडळाचे विश्वस्त मोतीलाल सांकला, सचिव डॉ. अविनाश अरगडे, व्याख्यानमालेचे प्रायोजक अभिमन्यू शेलार, माजी प्राचार्य सुरेशचंद्र म्हात्रे, प्राचार्य डॉ. राजेश लाटणे, डॉ. शिवाजी एंडाईत आदी उपस्थित होते.

युवराज मोहिते पुढे म्हणाले, संगणक युगामुळे प्रसार माध्यमांच्या क्षेत्रात आमूलाग्र परिवर्तन घडले. गुगल सर्च इंजिन व इंटरनेटमुळे अवघे जग एक खेडे झाले. वृत्तपत्र माध्यमांपासून ते दृकश्राव्य माध्यमां पर्यंत घडलेला हा प्रवास मानवी समाजावर वैशिष्ट्यपूर्ण प्रभाव करणारा ठरला. टेलिफोन, पेजर, फेसबुक, व्हाट्सअॅप, इंस्टाग्रामसारख्या समाज माध्यमांमध्ये काळाच्या ओघात घडलेले बदल लिखित माध्यमांच्या स्वरूपांना धक्का देणारे ठरले. अमेरिका, नेपाळ, भारत देशात घडलेल्या घटना, आंदोलने ही त्याची प्रातिनिधिक



उदाहरणे आहेत.

विलास शिंदे यांनी यावेळी "आजचे भवताल व शेती उद्योग" या विषयावर मार्गदर्शन केले. विवेक वेलणकर यांनी 'पदवीनंतर करिअरच्या संधी' या विषयावर मनोगत व्यक्त केले. शरद जोशी यांना अभिवादन करण्यासाठी महाराष्ट्रातील मंचर, आंबेठाण, अमरावती, नांदेड, नाशिक, संभाजीनगर, पुणे जिल्ह्यातील अनेक शेतकरी संघटनेचे पदाधिकारी व कार्यकर्ते आले होते. व्याख्यानमाला यशस्वी होण्यासाठी प्रा. रणजित काळभोर, प्रा. अभिजित बेंडाले, प्रा. कैलाश अस्तरकर, प्रा. अजय मोरे, प्रा. डॉ. हेमकांत गावडे, प्रा. लक्ष्मण मलमे, अनिकेत कदम आदींनी विशेष परिश्रम घेतले.

प्राचार्य डॉ. राजेश लाटणे यांनी स्वागत केले. प्रा. अभिजीत बेंडाले यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. शिवाजी एंडाईत यांनी आभार मानले.




# हरणीच्या शंभू महादेवाला भाविकांची गर्दी

■ वाल्हे (दै. संध्या)

पुरंदर तालुक्यातील हरणी येथील उंच टेकडीवर वसलेल्या महादेवाच्या मंदिरात शेकडो भाविकांनी श्रावण मासानिमित्त स्वयंभू शिवलिंगाच्या दर्शनाचा लाभ घेतला. यावेळी हर हर महादेवच्या जयघोषाने संपूर्ण टेकडी परिसर निनादूण गेला होता.

हरणी येथील टेकडीवर शंभू महादेवाचे पुरातन मंदिर असून या ठिकाणी भाविकांची नेहमीच रेलचेल पहावयास मिळते. श्रावणमासातील शेवटचा सोमवार असल्याने पहाटेच्या वेळी मंदिराचे पुजारी महादेव यादव यांसह हरणी ग्रामस्थांच्या वतीने येथील स्वयंभू शिवलिंगास दही दुधाने अभिषेक घालण्यात आला यावेळी इतरही धार्मिक विधी देखील मोठ्या उत्साहात संपन्न झाल्याने भाविकांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले होते,

या दरम्यान वाल्हे सह माहूर परिंचे हरगुडे मांडकी जेऊर नाव्ही भोंगवली आदी ठिकाणच्या भाविकांनी अक्षरशः पहाटेपासूनच महादेवाच्या दर्शनासाठी रांगेत उभे राहून अलोट गर्दी केली होती. त्यानंतर भाविकांना येथील ग्रामस्थ मंडळातर्फे उपवासाची केळी व खिचडीचे प्रसाद म्हणून वाटप करण्यात आले.

शंभू महादेवाच्या मंदिराचा जीर्णोद्धार तसेच मंदिर परिसराच्या सुशोभीकरणासाठी हरणी येथील ग्रामस्थ मंडळाच्या वतीने मदतीचे आवाहन करण्यात आले आहे.

# आंबेगावच्या उत्तर भागात पावसाची ओढ

## घोड नदीची पाणीपातळी खालावल्याने शेतकरी संकटात

■ म्हाळुंगे पडवळ (दै. संध्या)

आंबेगाव तालुक्याच्या उत्तर भागात महिनाभरापासून पावसाने ओढ दिल्याने शेतकरी चिंताग्रस्त झाले आहेत. घोड नदीवर असलेल्या कोल्हापूर पद्धतीच्या बंधाऱ्यांना अद्याप ढापे न बसवल्याने नदीची पाणीपातळी खोल गेली आहे. त्यामुळे नदीलगतच्या विहिरींना नदीपात्रातून पाणी येत नसल्याने शेतकऱ्यांची पिकांना पाणी देण्यासाठी मोठी धडपड सुरू आहे.

घोड नदीच्या काठावरील चांडोली खुर्द, म्हाळुंगे पडवळ, साकोरे, नांदूर, विठ्ठलवाडी आदी परिसरातील अनेक विहिरी नदीच्या पाण्यावर अवलंबून आहेत. नदीपात्रातील पाणीपातळी खालावल्याने विहिरींमध्येही पाण्याची आवक कमी झाली आहे. उपलब्ध पाण्याचा वापर पिकांसाठी करण्यासाठी धडपड करताना दिसत आहेत.

पावसाने ओढ दिल्यामुळे सोयाबीन, पालेभाज्या तसेच इतर खरीप पिकांना पाण्याचा ताण सहन करावा लागत आहे. काही भागात पावसाळी बाजरीचे पीकही पाण्याअभावी सुकण्याच्या मार्गावर आहे. मागील एक महिन्यापासून शेतकरी पावसाची प्रतीक्षा करीत आहेत. जमिनीतील ओलावा कमी झाल्याने शेती पाण्यासाठी आसुसल्याचे चित्र सर्वत्र दिसून येत आहे.



गेल्या काही दिवसांपासून परिसरात ढगाळ वातावरण निर्माण होत आहे; मात्र, प्रत्यक्षात पाऊस पडत नसल्याने शेतकऱ्यांची चिंता वाढली आहे. वातावरणात मोठ्या प्रमाणात दमटपणा असून, उष्णताही जाणवत आहे. पावसाअभावी जमिनीला भेगा पडण्यास सुरुवात झाली असून, पिकांची वाढ खुंटत आहे.

तालुक्याच्या डोंगर भागात पावसाने ओढ दिल्याचा परिणाम जनावरांच्या चाऱ्यावर देखील झाला आहे. पावसाळ्यात उपलब्ध होणारा ओला चारा सुकून गेल्याने पशुपालकांसमोर जनावरांच्या चाऱ्याचा प्रश्न निर्माण झाला आहे. जनावरांची पोटाची खळगी भरण्यासाठी शेतकऱ्यांना अतिरिक्त खर्च करावा लागत आहे.

पावसाअभावी पिकांचे उत्पादन घटण्याची शक्यता असतानाच बाजारपेठेतही शेतकऱ्यांना अपेक्षित दर मिळत नाहीत. कांदा वगळता इतर पालेभाज्यांना समाधानकारक बाजारभाव मिळत नसल्याने उत्पादन खर्चही निघत नसल्याची शेतकऱ्यांची तक्रार आहे. त्यामुळे एकीकडे पाण्याची चिंता आणि दुसरीकडे बाजारभावाचा फटका, अशा दुहेरी संकटात शेतकरी सापडला आहे.

# खेळामुळे शरीर सुदृढ, मन प्रसन्न आणि व्यक्तिमत्त्वाचा विकास : चैतन्य महाराज लोंढे

■ आळंदी (दै. संध्या)

खेळामुळे शरीर सुदृढ राहते, मन प्रसन्न राहते आणि व्यक्तिमत्त्वाचा सर्वांगीण विकास होतो. खेळातून शिस्त, संयम, आत्मविश्वास आणि जिद्द निर्माण होते. त्यामुळे विद्यार्थ्यांनी व युवकांनी शिक्षणासोबत क्रीडेलाही प्राधान्य देऊन नियमित खेळावे, असे प्रतिपादन आळंदी देवस्थानचे विश्वस्त चैतन्य महाराज लोंढे यांनी केले. ऑल महाराष्ट्र वुशू असोसिएशनच्या वतीने २३ वी सब-ज्युनिअर व ज्युनिअर वुशू अजिंक्यपद स्पर्धा आळंदीत आयोजित करण्यात आली आहे. राज्यभरातून सहभागी झालेल्या युवा खेळाडूंना या स्पर्धेत आपले क्रीडा कौशल्य दाखविण्याची संधी मिळाली आहे. विविध वयोगटांतील खेळाडूंनी स्पर्धेत उत्साहाने सहभाग घेतला. यावेळी महाराष्ट्र ऑलिंपिक असोसिएशनचे अध्यक्ष तथा केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांनी दूरध्वनीद्वारे स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या. नगराध्यक्ष प्रशांत कुऱ्हाडे यांनीही खेळाडूंना मार्गदर्शन केले. खेळाच्या माध्यमातून युवकांनी शारीरिक व मानसिकदृष्ट्या सक्षम होऊन क्रीडा क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करावी, असे त्यांनी सांगितले.

## थोडक्यात पण महत्वाचे



### धावती इर्टिगा कार महामार्गावरच पेटली; आनेवाडीजवळ शॉर्टसर्किटने दुर्घटना

**सातारा : दैनिक संध्या**

सातारा-पुणे-बंगळूर महामार्गावर आनेवाडी गावच्या हद्दीत साताऱ्याहून पुण्याकडे निघालेल्या इर्टिगा कारला अचानक आग लागून कार पूर्णपणे जळून खाक झाली. शॉर्टसर्किटमुळे ही आग लागल्याचा प्राथमिक अंदाज आहे. कारमधून धूर येत असल्याचे लक्षात येताच चालकाने प्रसंगावधान राखल्याने मोठी दुर्घटना टळून चौघांचेही प्राण बचावले. गणेश आनंदराव शिंदे (रा. आसगाव, ता. कोरेगाव) हे आपल्या कुटुंबातील सदस्यांसह एमएच ११ डीझेड ३१६८ क्रमांकाच्या इर्टिगा कारने साताऱ्याहून पुण्याकडे निघाले होते. आनेवाडी गावच्या हद्दीत, टोलनाक्याजवळ आल्यानंतर अचानक कारमधून धूर येऊ लागला. कारमध्ये काहीतरी बिघाड झाल्याचे लक्षात येताच गणेश शिंदे यांनी प्रसंगावधान राखत कार तातडीने महामार्गाच्या बाजूला घेतली. त्यानंतर कारमधील तिघांना सुरक्षितपणे खाली उतरवले. प्रवासी खाली उतरल्याच्या काही वेळातच कारमधून मोठ्या प्रमाणात ज्वाला भडकल्या. पाहता पाहता आगीने संपूर्ण कारला वेढले आणि काही वेळातच कार जळून पूर्णपणे खाक झाली. घटनेची माहिती मिळताच भुईंज महामार्ग विभागाचे फौजदार हेमंत शिंदे, पोलीस हवालदार संतोष ननावरे, अनिकेत जाधव, अभिजित पवार, ओमकार कांबळे, रोहित भोसले व मंदार शिंदे यांनी घटनास्थळी धाव घेतली. आगीची तीव्रता लक्षात घेऊन पोलिसांनी खबरदारी म्हणून महामार्गावरील वाहतूक सर्व्हिस रोडने वळवली. महामार्गावर वाहनांना आग लागण्याच्या घटना वारंवार घडत असताना आपत्कालीन परिस्थितीत अग्निशमन यंत्रणा तातडीने उपलब्ध होणे गरजेचे आहे.



### भाव कोसळल्याने व्यापाऱ्याने टोमॅटो रस्त्यावर फेकले

**भोकरदन : दैनिक संध्या**

शहरातील शनिवारी भरणाऱ्या आठवडी बाजारात टोमॅटोची आवक वाढल्याने टोमॅटोच्या दरात मोठी घसरण झाली. वाहतुकीचा खर्चही निघत नसल्यामुळे अखेर वैतागलेल्या व्यापाऱ्यांनी ग्राहकांना फुकट टोमॅटो वाटून टाकले. त्यानंतर उरलेले टोमॅटो रस्त्यावर फेकून देत व्यापाऱ्यांनी बाजारातून काढता पाय घेतला. भोकरदनच्या शनिवारच्या आठवडी बाजारात आसपासच्या भागातून शेतकऱ्यांनी आणि व्यापाऱ्यांनी मोठ्या प्रमाणात टमाटे विक्रीसाठी आणले होते. मात्र, मागणीच्या तुलनेत आवक प्रचंड झाल्याने टमाट्याचे भाव कोसळल्या गेले. सुरुवातीला पाच रुपये किलो या कवडीमोलाने टमाटे विकण्याचा प्रयत्न झाला. मात्र खरेदीदारांचा प्रतिसाद कमी असल्याने आणि विक्री न झालेला माल पुन्हा वाहतूक करून माघारी नेणे आर्थिकदृष्ट्या परवडणारे नसल्याने व्यापाऱ्यांनी नागरिकांना मोफत टमाटे घेऊन जाण्याचे आवाहन केले. यावेळी नागरिकांची मोठी गर्दी केल्याचे दिसुन आले. मोफत वाटुनही विक्रेत्यांकडे टमाटे शिल्लक राहिल्याने त्यांनी उरलेला माल वाहतुक खर्च परवडत नसल्याने बाजारातच टाकून दिला. टमाट्याच्या घसरलेल्या दरामुळे शेतकरी आणि स्थानिक व्यापाऱ्यांमध्ये प्रचंड निराशा पसरली असून टमाटे उत्पादक शेतकरी व विक्रेत्या व्यापाऱ्यांना मोठा तोटा सहन करावा लागला.

# कक्कया समाजाच्या युवा परिवर्तन परिषदेसाठी बैठक संपन्न

■ मुंबई (दै. संध्या)

कक्कया समाजाच्या वतीने ४ ऑक्टोबर २०२६ रोजी आयोजित राज्यस्तरीय युवा परिवर्तन परिषदेच्या पूर्वतयारीसाठी रवि.दिनांक ६ सप्टेंबर रोजी सकाळी ११ वाजता गणेश विद्या मंदिर, धारावी येथे बैठक घेण्यात आली. बैठकीस विविध क्षेत्रातील मान्यवर, सामाजिक कार्यकर्ते, पालक आणि मोठ्या संख्येने युवकऱ्युवती उपस्थित होते.

बैठकीचे सूत्रसंचालन उलेश खंदारे यांनी केले. यावेळी प्रथमच व्यासपीठ पूर्णपणे युवकऱ्युवतींसाठी खुले ठेवण्यात आले. "तुम्हाला कोणत्या क्षेत्रात करिअर करायचे आहे,ते स्वतः येऊन सांगा," असे आवाहन त्यांनी केले. यावेळी युवकऱ्युवतींनी मनमोकळेपणाने मते मांडली. आदित्य खंदारे म्हणाला, पालकांना मुले डॉक्टर, इंजिनिअर व्हावीत असे वाटते, पण आमचे मत विचारात घेतले जात नाही. प्रणव कळंबे याने UPSC/MPSC पेक्षा व्यवसायात अधिक पैसा आणि संधी असल्याचे सांगितले. सीए सफल खंदारे याने व्यावसायिक शिक्षण घेऊन तज्ञांच्या मार्गदर्शनाने व्यवसाय करण्याचा सल्ला दिला.

पृथ्वीराज कदम याने नवीन तंत्रज्ञान आत्मसात करण्यावर भर दिला, तर साई खरटमोल म्हणाला, मानसिक तणाव टाळण्यासाठी पालकांशी मनमोकळा संवाद गरजेचा आहे. डॉ. विनायक कोकणे यांनी पालकांच्या दबावामुळे मुलांमध्ये बीपी, हार्ट अटॅकचे प्रमाण वाढत असल्याची चिंता व्यक्त केली. सागर धडके यांनी धारावीतील छोट्या कारखान्यातून नवी मुंबईत कंपनी उभारल्याचा अनुभव सांगून AI चा वापर करण्याचे आवाहन केले.



दिव्या कदम, अर्बिता खंदारे यांनी पालक-पाल्यांतील कम्युनिकेशन गॅप आणि गुजराती-मारवाडी समाजाप्रमाणे मराठी युवकांनीही व्यवसायाकडे वळावे, असे मत मांडले. वैभवी पोळ हिने सोशल मीडियाचा चांगला वापर करण्याचे सांगितले.नतेस शेरखाने, विकी व्हटकर, मनीषा कटके, नीला सोनवणे यांनीही मार्गदर्शन केले.

सचिन शेरखाने यांनी सांगितले की, ३० ऑगस्ट रोजी झालेल्या ज्येष्ठांच्या बैठकीत राजेश खंदारे, सूर्यकांत इंगळे, नरसिंग कावळे यांनी ही संकल्पना मांडली. संजय कावळे म्हणाले, मराठा समाजाप्रमाणे आपणही एकत्र यायला हवे.

समारोपप्रसंगी राजेश खंदारे म्हणाले, गरीब विद्यार्थ्यांना मदत आणि तज्ञ मार्गदर्शनासाठी हे व्यासपीठ निर्माण केले आहे. ४ ऑक्टोबरची परिषद युवकांनीच यशस्वी करावी. सूर्यकांत इंगळे यांनी मुंबई, नवी मुंबई, ठाणे येथे पुढील बैठका घेण्याचे आवाहन केले.

# महाराष्ट्र ३३,८७२ स्टार्टअप्ससह देशात अव्वल : अमित शाह

■ गोवा (दै. संध्या)

महाराष्ट्र ३३,८७२ स्टार्टअप्ससह देशात प्रथम क्रमांकावर असून, देशाची वित्तीय राजधानी मुंबई जागतिक भांडवलाचे महत्त्वाचे केंद्र म्हणून वेगाने उदयास येत आहे, असे प्रतिपादन केंद्रीय गृह व सहकार मंत्री अमित शाह यांनी आज गोवा येथे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडलेल्या पश्चिम विभागीय परिषदेच्या 28 व्या बैठकीत केले. केंद्रीय गृह मंत्रालयांतर्गत आंतरराज्यीय परिषद सचिवालयाद्वारे या बैठकीचे आयोजन करण्यात आले होते.

महाराष्ट्राच्या आर्थिक आणि औद्योगिक विकासाचा उल्लेख करत केंद्रीय मंत्री अमित शाह यांनी राज्याची स्टार्टअप परिसंस्था आणि मुंबईचा वाढता जागतिक दर्जा या बाबींना ठळकपणे अधोरेखित केले. तसेच, महाराष्ट्राने प्राथमिक कृषी पतसंस्थांच्या (PACS) संगणकीकरणाचे 98% काम पूर्ण करून उल्लेखनीय प्रगती साधली असल्याचेही त्यांनी नमूद केले.

2026-27 या चालू आर्थिक वर्षाच्या पहिल्या तिमाहीत भारताने 7.8% इतका विकास दर नोंदवल्याचे सांगत, जागतिक पातळीवरील अस्थिरतेच्या पार्श्वभूमीवर हा दर साध्य करणे संपूर्ण देशासाठी अभिमानाची बाब असल्याचे केंद्रीय मंत्री अमित शाह म्हणाले. पश्चिम विभाग हा देशासाठी अनेक दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा असून, देशातील सर्वात मोठे आर्थिक, औद्योगिक आणि वित्तीय केंद्र असल्याचेही त्यांनी सांगितले.

सायबर गुन्ह्यांना आळा घालण्यासाठी सर्व अर्बन को-ऑपरेटिव्ह बँकांना FCFRS प्रणाली व I4C केंद्राशी जोडणे आवश्यक असल्याचे केंद्रीय मंत्री अमित शाह यांनी नमूद केले. तसेच, आगामी काळात किनारपट्टीच्या सुरक्षेला अधिक बळ देण्यासाठी गृह मंत्रालयाकडून विशेष प्रयत्न करण्यात येणार असल्याचेही त्यांनी सांगितले.

या बैठकीत महिला व बालकांविरोधातील अत्याचाराच्या प्रकरणांच्या जलद तपास व सुनावणीसाठी विशेष जलदगती न्यायालयांचे प्रभावी कामकाज सुनिश्चित करणे, आपत्कालीन प्रतिसाद समर्थन प्रणाली (ERSS-112), अन्न सुरक्षा मानकांशी संबंधित मुद्दे, आयुष्मान भारत-प्रधानमंत्री जन आरोग्य योजना, प्रत्येक गावाच्या निर्धारित कक्षेत प्रत्यक्ष बँकिंग सुविधा उपलब्ध करून देणे, रेल्वे विकास प्रकल्प व पर्यावरण मंजुरीशी संबंधित मुद्दे यांवर सविस्तर चर्चा झाली. याशिवाय, शहरी विकास नियोजन, वीज पुरवठ्याशी संबंधित समस्या, प्राथमिक कृषी पतसंस्थांना (PACS) अधिक सक्षम करणे, पोषण अभियानाच्या माध्यमातून बालकांमधील कुपोषण दूर करणे, शालेय विद्यार्थ्यांचे शाळा सोडण्याचे प्रमाण कमी करणे, सार्वजनिक रुग्णालयांचा आयुष्मान भारत-प्रधानमंत्री जन आरोग्य योजनेतील सहभाग, तसेच सायबर गुन्हेगारी व डिजिटल पायाभूत सुविधांशी संबंधित मुद्द्यांवरही चर्चा करण्यात आली.

# ‘प्रोजेक्ट महादेवा’च्या युवा फुटबॉलपटूंना ब्राझीलचे कर्णधार काफू यांच्याकडून कौतुकाची थाप

■ मुंबई (दै. संध्या)

मैदानावरील दमदार कामगिरी आणि त्यानंतर जागतिक फुटबॉलमधील दिग्गजाकडून मिळालेली कौतुकाची थाप अशा दुहेरी आनंदाचे क्षण ‘प्रोजेक्ट महादेवा’च्या युवा फुटबॉलपटूंनी अनुभवले. आगामी आय-लीग तसेच इतर स्पर्धात्मक सामन्यांच्या तयारीच्या दृष्टीने खेळविण्यात आलेल्या मैत्रीपूर्ण सामन्यांमध्ये प्रोजेक्ट महादेवाच्या मुला-मुलींनी आपली गुणवत्ता सिद्ध केली.

मुंबईतील कूपरेज फुटबॉल मैदानावर झालेल्या सामन्यात प्रोजेक्ट महादेवाच्या मुलांच्या संघाने मुंबई स्कूल स्पोर्ट्स असोसिएशन स्तरावरील विजेत्या डॉन बॉस्को, माटुंगा यांच्या १४ वर्षांखालील संघावर ५–० असा दणदणीत विजय मिळवला. तर मुलींच्या संघाने महाराष्ट्र राज्यस्तरीय १५ वर्षांखालील WIFA विजेत्या संघाविरुद्ध १–१ अशी बरोबरी साधत उत्कृष्ट लढत दिली.

या सामन्यांमध्ये खेळाडूंनी दाखवलेले तांत्रिक कौशल्य, सांघिक खेळ, शिस्त, आत्मविश्वास आणि स्पर्धात्मक वृत्ती हे सातत्यपूर्ण प्रशिक्षण आणि विशेष शिबिरांमधून झालेल्या त्यांच्या प्रगतीचे द्योतक ठरले.



या युवा खेळाडूंच्या प्रवासात आणखी एक अविस्मरणीय क्षण जोडला गेला. प्रोजेक्ट महादेवाच्या खेळाडूंना ब्राझीलचे महान फुटबॉलपटू आणि फिफा विश्वचषक विजेत्या ब्राझील संघाचे कर्णधार काफू यांची भेट घेण्याची आणि त्यांच्याशी संवाद साधण्याची विशेष संधी मिळाली.

काफू यांनी या युवा खेळाडूंच्या प्रयत्नांचे कौतुक करत त्यांना पुढील वाटचालीसाठी प्रोत्साहित केले. तसेच खेळाडूंना त्यांच्या हस्ते विशेष ‘Letter of Appreciation’ प्रदान करण्यात आले. जागतिक फुटबॉलमधील एका महान खेळाडूकडून मिळालेली ही कौतुकाची थाप मुलांसाठी प्रेरणादायी ठरली.

यावेळी खासदार तथा WIFA अध्यक्ष प्रफुल्ल पटेल, सुप्रसिद्ध अभिनेते रितेश देशमुख आणि भारताचे दिग्गज क्रिकेटपटू हरभजन सिंह उपस्थित होते. त्यांनीही युवा फुटबॉलपटूंशी संवाद साधत त्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

प्रोजेक्ट महादेवाच्या आतापर्यंतच्या प्रगतीबाबत समाधान व्यक्त करताना मित्रा (MITRA) चे मुख्य कार्यकारी अधिकारी तथा मुख्यमंत्री महाराष्ट्र यांचे मुख्य आर्थिक सल्लागार प्रवीण परदेशी यांनी युवा खेळाडूंची कामगिरी ही प्रकल्पांतर्गत सुरू असलेल्या शिस्तबद्ध आणि नियोजनबद्ध प्रशिक्षणाचे आश्वासक फलित असल्याचे मत व्यक्त केले.

या उपक्रमाचा उद्देश केवळ तात्कालिक विजय मिळवणे नसून, पाच वर्षांच्या कालावधीत व्यावसायिक प्रशिक्षण, शिक्षण, क्रीडा विज्ञान, स्पर्धात्मक सामने आणि आंतरराष्ट्रीय स्तरावरील अनुभवाच्या माध्यमातून खेळाडूंचा सर्वांगीण विकास करणे हा असल्याचे त्यांनी अधोरेखित केले. सातत्यपूर्ण प्रशिक्षण आणि योग्य संधींच्या माध्यमातून महाराष्ट्रातील हे युवा खेळाडू भविष्यात राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर आपली छाप उमटवतील, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या दूरदर्शी नेतृत्वाखाली संकल्पित आणि पुढे नेण्यात येत असलेला ‘प्रोजेक्ट महादेवा’ हा महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातील युवा फुटबॉल प्रतिभा शोधून त्यांना राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरासाठी घडविण्याचा महत्त्वाकांक्षी उपक्रम आहे.

उपमुख्यमंत्री तथा क्रीडा मंत्री सुनेत्रा अजित पवार यांच्या सहकार्याने, क्रीडा विभाग, महाराष्ट्र शासन; महाराष्ट्र इन्स्टिट्यूशन फॉर ट्रान्सफॉर्मेशन (MITRA); व्हिलेज सोशल ट्रान्सफॉर्मेशन फाउंडेशन (VSTF); वेस्टर्न इंडिया फुटबॉल असोसिएशन (WIFA) आणि Enaball Sports यांच्या संयुक्त प्रयत्नातून हा उपक्रम राबविण्यात येत आहे.

प्रोजेक्ट महादेवाच्या पाच वर्षांच्या निवासी प्रशिक्षण आणि शिष्यवृत्ती कार्यक्रमामध्ये व्यावसायिक फुटबॉल प्रशिक्षणासोबत शिक्षण, क्रीडा विज्ञान, पोषण, शारीरिक व मानसिक क्षमता विकास, स्पर्धात्मक सामन्यांचा अनुभव, सर्वांगीण व्यक्तिमत्त्व विकास आणि आंतरराष्ट्रीय फुटबॉल अनुभव यांचा समावेश आहे.

या उपक्रमाचे दीर्घकालीन ध्येय स्पष्ट आहे — महाराष्ट्रातून अधिकाधिक दर्जेदार फुटबॉलपटू घडवून त्यांना भारतीय संघापर्यंत पोहोचण्याची सक्षम वाट निर्माण करणे आणि भारताच्या फिफा विश्वचषक २०३४ च्या स्वप्नाला बळ देणे.

# दादरमध्ये विद्यार्थ्यांसाठी भविष्यातील तंत्रज्ञानाचे दालन खुले; छबिलदास शाळेत प्रयोगशाळा!

## प्रसिद्ध अभिनेते - दिग्दर्शक अजित भुरे यांच्या हस्ते प्रयोगशाळेचे उद्घाटन संपन्न ; रॅस्पबेरी पाय, अर्डुइनो, इंटरनेट ऑफ थिंग्जसह ९० प्रत्यक्ष प्रकल्पांचा समावेश!

■ मुंबई (दै. संध्या)

दादर पश्चिम येथील १८९२ साली स्थापन झालेल्या 'जनरल एज्युकेशन इन्स्टिट्यूट'च्या (General Education Institute) 'छबिलदास इंग्लिश मीडियम स्कूल' (Chhabildas English Medium School, (CBSE Affiliated) शाळेत विद्यार्थ्यांना आधुनिक तंत्रज्ञानाचे प्रत्यक्ष आणि प्रयोगाधारित शिक्षण मिळावे, या उद्देशाने उभारण्यात आलेल्या अत्याधुनिक कृत्रिम बुद्धिमत्ता, गणित व रोबोटिक्स प्रयोगशाळेचे उद्घाटन प्रसिद्ध डबिंग आर्टिस्ट, अभिनेते, दिग्दर्शक व निर्माते अजित भुरे यांच्या हस्ते आज झाले. या प्रयोगशाळेमुळे दादर परिसरातील विद्यार्थ्यांसाठी कृत्रिम बुद्धिमत्ता, रोबोटिक्स आणि इंटरनेट आधारित तंत्रज्ञान प्रत्यक्ष अनुभवण्याची नवी संधी उपलब्ध झाली आहे. याप्रसंगी संस्थेचे अध्यक्ष शैलेंद्र साळवी यांनी मान्यवरांचे स्वागत करून त्यांना या आधुनिक लॅबद्दल माहिती दिली. कोषाध्यक्ष रवींद्र ताम्रस, संचालिका आरती राऊत, माजी विद्यार्थी विजय पाध्ये यांसह अनेक आजी - माजी विद्यार्थी - संचालक - शिक्षकांची विशेष उपस्थिती लाभली होती.

या प्रयोगशाळेचे प्रात्यक्षिक आणि सादरीकरण कृत्रिम बुद्धिमत्ता व रोबोटिक्स सल्लागार डॉ. अमेय पांगारकर यांनी केले. विद्यार्थ्यांनी केवळ तंत्रज्ञान समजून न घेता ते स्वतः हाताळावे, प्रयोग करावेत, प्रश्न विचारावेत आणि स्वतःच्या कल्पनांमधून नवनवे प्रकल्प निर्माण करावेत, या उद्देशाने प्रयोगशाळेची रचना करण्यात आली आहे.



प्रयोगशाळेत रॅस्पबेरी पाय, अर्डुइनो आणि इंटरनेट ऑफ थिंग्ज या तंत्रज्ञानावर आधारित एकूण ९० प्रत्यक्ष प्रकल्पांचा समावेश आहे. तापमान, आर्द्रता, हवामान, सुरक्षा, हालचाल, मातीतील ओलावा, वायू गळती, आरएफआयडी, प्रकाश नियंत्रण, वाहनतळ, पाण्याची पातळी आदी विविध विषयांवरील प्रकल्प विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष तयार करता व हाताळता येणार आहेत. याशिवाय पायथॉन संगणक प्रोग्रामिंग, तर्कशक्ती विकास, ड्रोन जोडणी, इलेक्ट्रॉनिक्स आणि कृत्रिम बुद्धिमत्तेच्या विविध संकल्पनांचे प्रशिक्षण दिले जाणार आहे.

शाळेतील वर्गखोल्यांमध्येही आधुनिक शैक्षणिक सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. आकर्षक भित्तिचित्रे, रंगसंगती, आधुनिक बाके(बेंचेस), डिजिटल फलक, पडदे, ध्वनियंत्रणा आणि विविध शैक्षणिक साधनांमुळे वर्गखोल्यांना आधुनिक रूप देण्यात आले आहे. उद्घाटनापूर्वी मान्यवरांनी वर्गखोल्यांची पाहणी केली.




कार्यक्रमात रोबोट, मानवरूपी रोबोट, ड्रोन आणि विविध यांत्रिक उपकरणांचे प्रत्यक्ष प्रात्यक्षिक सादर करण्यात आले. त्यामुळे विद्यार्थी आणि पालकांमध्ये मोठे कुतूहल निर्माण झाले. विद्यार्थ्यांनी डॉ. पांगारकर यांच्याशी संवाद साधत कृत्रिम बुद्धिमत्ता आणि रोबोटिक्सविषयी अनेक प्रश्न विचारले. कृत्रिम बुद्धिमत्तेचा योग्य, सर्जनशील आणि जबाबदारीने वापर कसा करावा, याबाबतही त्यांनी मार्गदर्शन केले.

General Education Institute चे अध्यक्ष शैलेंद्र साळवी म्हणाले, “१८९२ पासून शिक्षणाची परंपरा जपत आलेल्या संस्थेने काळानुसार तंत्रज्ञान स्वीकारले आहे. विद्यार्थ्यांना केवळ तंत्रज्ञान शिकविणे हा आमचा उद्देश नाही; तर त्यांना प्रश्न विचारणारे, प्रयोग करणारे आणि स्वतःच्या कल्पनांमधून नवनिर्मिती करणारे विद्यार्थी घडविणे हे आमचे ध्येय आहे.”

अजित भुरे यांनी या उपक्रमाचे कौतुक करताना सांगितले, “मुलांनी केवळ पाठ्यपुस्तकातून ज्ञान घेण्याऐवजी प्रश्न विचारले, प्रयोग केले आणि स्वतः काहीतरी निर्माण केले पाहिजे. या प्रयोगशाळेत विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर दिसणारे कुतूहल आणि उत्साह हीच या उपक्रमाची खरी ताकद आहे.” मुख्याध्यापिका सौ. कोमल कडवे म्हणाल्या, “विद्यार्थ्यांनी तयार उत्तरे शोधण्याऐवजी स्वतः प्रश्न विचारावेत, प्रयोग करावेत आणि स्वतः नवनिर्मिती करावी, ही आमची भूमिका आहे. 'कृत्रिम बुद्धिमत्ता, गणित आणि रोबोटिक्स' या प्रयोगशाळेमुळे छबिलदासच्या आमच्या विद्यार्थ्यांचे शिक्षण अधिक अनुभवाधारित आणि आनंददायी होणार आहे.”

“सहज आणि झटपट उत्तरे मिळविण्याची सवय लावण्यापेक्षा विद्यार्थ्यांमधील कुतूहल जागृत करणे” हा या उपक्रमाचा मुख्य विचार आहे. “येथे स्वप्न पाहा सर्वत्र यश मिळवा” या संकल्पनेतून विद्यार्थ्यांच्या कल्पनाशक्तीला आणि सर्जनशीलतेला चालना देत त्यांना भविष्यातील तंत्रज्ञानासाठी तयार करण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे.

कृत्रिम बुद्धिमत्ता, रोबोटिक्स, नवोन्मेष आणि प्रयोगाधारित शिक्षण यांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना भविष्यातील संधींसाठी सक्षम करण्याच्या दिशेने Chhabildas English Medium School ने उचललेले हे महत्त्वपूर्ण पाऊल असल्याचे मत उपस्थित मान्यवर व पालकांनी नोंदवले.

## थोडक्यात पण महत्वाचे



### बोपगावच्या १५० विद्यार्थ्यांना स्कूल बॅगचे वाटप

**सासवड : दैनिक संध्या**

बोपगाव (ता.पुरंदर) येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांना जेजुरीच्या श्री मार्तंड देव संस्थानच्या वतीने १५० विद्यार्थ्यांना देवस्थानचे विश्वस्त मंगेश घोणे, नीरा कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती संदीप फडतरे, जिल्हा परिषदेचे माजी सदस्य योगेश फडतरे, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष रामकृष्ण फडतरे यांच्या हस्ते दप्तर वाटप करण्यात आले. याप्रसंगी मयूर फडतरे, विजय फडतरे, मस्कु फडतरे, संपत गायकवाड, शहाजी शिंदे, समाधान शिंदे, शाळा व्यवस्थापन समितीचे सर्व सदस्य, मुख्याध्यापिका शोभा बडदे, सर्व शिक्षक व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक शिक्षिका सुजाता पवार यांनी केले. विद्यार्थ्यांना शालेय साहित्य मिळाल्याने त्यांच्या चेहऱ्यावर आनंद दिसून आला. या उपक्रमाचे उपस्थितांकडून कौतुक करण्यात आले.




### लोचन शिवले यांना 'आजित प्रेरणा' पुरस्कार कृषीमंत्री दत्ता मामा भरणे यांच्या हस्ते प्रदान

**कोरेगावमुळ : दैनिक संध्या**

लोकनेते स्व.अजितदादा पवार यांच्या स्मरणार्थ हवेली तालुका राष्ट्रवादी कॉँग्रेस पक्षाच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या 'आदर्श कार्यकर्ता अजित प्रेरणा पुरस्कार २०२६' ने तुळापूरच्या माजी सरपंच तथा हवेली तालुका राष्ट्रवादी महिला कॉँग्रेसच्या माजी अध्यक्षा लोचन शिवले यांचा गौरव करण्यात आला. महाराष्ट्र राज्याचे कृषिमंत्री दत्तात्रय मामा भरणे यांच्या शुभहस्ते त्यांना हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. यावेळी आमदार चेतन तुपे पाटील, राष्ट्रवादी युवती कॉँग्रेसच्या प्रदेशाध्यक्षा निर्मला नवले, पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे चेअरमन दिगंबर दुर्गाडे, जिल्हा बँकेचे संचालक सुरेश घुले, प्रवीण शिंदे, नगरसेवक निवृत्ती बांदल, गणेश ढोरे, श्वेता सचिन घुले, नगराध्यक्ष संतोष सरोदे, उपनगराध्यक्ष ओंकार कामठे, पंचायत समितीचे सभापती युवराज काकडे, उपसभापती विद्या गायकवाड, हवेली बाजार समितीचे उपसभापती नानासो आबनावे, नंदू काळभोर, गुलाब चौधरी, संतोष कांचन यांच्यासह अनेक पुरस्कार्थी, पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. लोकनेते स्व.अजितदादा पवार यांच्या कार्याचे स्मरण तसेच त्यांच्या विचारांवर निष्ठेने कार्य करणाऱ्या कार्यकर्त्यांचा गौरव करण्याच्या उद्देशाने या पुरस्काराचे आयोजन करण्यात आले होते. अजितदादांसोबत अनेक वर्षे निष्ठेने कार्य करणाऱ्या हवेली तालुक्यातील कार्यकर्त्यांचा 'अजित प्रेरणा पुरस्कार' देऊन सन्मान करण्यात आला. कार्यक्रमाचे आयोजन हवेली तालुका राष्ट्रवादी कॉँग्रेसचे अध्यक्ष भरत झांबरे आणि राष्ट्रीय राष्ट्रवादी युवक कॉँग्रेसचे अध्यक्ष आकाश झांबरे यांनी केले होते. कार्यक्रमास राष्ट्रवादी कॉँग्रेसचे पदाधिकारी, कार्यकर्ते व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.



### अनाथांना एक हात मदतीचा

**पुणे : दैनिक संध्या**

प्रणिती ग्रामीण संस्था, पुणे व राजे उमाजी नाईक प्रतिष्ठान, राख यांच्यावतीने डॉ. सिंधुताई सपकाळ यांच्या पुरंदर तालुक्यातील कुंभारवळन येथील ममता बालसधन या संस्थेतील मुलींना शैक्षणिक साहित्य वाटप करण्यात आले. यावेळी प्रणिती ग्रामीण संस्थाचे संस्थापक अध्यक्ष आदरणीय श्री शांताराम राणे सर यांनी यापुढेही आर्थिक व वस्तूंस्वरूपात मदत देण्याचे आपल्या मनोगतातून व्यक्त केली. तसेच एच डी एफ सी.बँकेचे अधिकारी श्री निलेश चव्हाण यांनी राजे उमाजी नाईक प्रतिष्ठान आर्थिक मदत देण्याचे जाहीर केले. यावेळी ममता बालसधनच्या वसतिगृह अधीक्षक सीमा पानसरे मॅडम तसेच दीपक गायकवाड,संदीप गायकवाड राजे उमाजी नाईक प्रतिष्ठानचे अध्यक्ष आकाश चव्हाण, उपाध्यक्ष सुयश चव्हाण,खजिनदार संकेत चव्हाण, सदस्य समीर चव्हाण ,अक्षय चव्हाण ,प्रतीक सोनवणे ,प्रशांत चव्हाण ओंकार चव्हाण, जय चव्हाण इतर सर्व सदस्य उपस्थित होते. ममता बालसधनच्या सर्व विद्यार्थिनी उपस्थित होत्या. कार्यक्रमाचे सूत्रसंचलन व आभार संदीप गायकवाड यांनी केले.

### मद्यप्राशन करून वाहन चालविणाऱ्या वाहनचालकांविरुद्ध तपासणी मोहीम

**बारामती : दैनिक संध्या**



उप प्रादेशिक परिवहन कार्यालयाच्या वायुवेग पथकांमार्फत मद्यप्राशन करून वाहन चालविणाऱ्या वाहनचालकांविरुद्ध विशेष "Drink and Drive" तपासणी मोहीम उप प्रादेशिक परिवहन अधिकारी सुरेंद्र निकम व सहाय्यक प्रादेशिक परिवहन अधिकारी राहुल गावडे यांच्या मार्गदर्शनाखाली राबविण्यात आली. या मोहिमेदरम्यान विविध ठिकाणी वाहनचालकांची ब्रेथ ॲनालायझरद्वारे तपासणी करण्यात आली. एकूण ३१ वाहनचालकांची तपासणी करण्यात आली असून, त्यापैकी मद्यप्राशन करून वाहन चालविताना आढळलेल्या ६ वाहनचालकांविरुद्ध मोटार वाहन कायद्यातील तरतुदीनुसार कायदेशीर कारवाई करण्यात आली. मद्यप्राशन केल्यानंतर वाहन चालविल्यास वाहनचालकाची निर्णयक्षमता, प्रतिक्रिया देण्याचा वेग आणि वाहनावरील नियंत्रण कमी होते. त्यामुळे गंभीर व प्राणघातक अपघात होण्याचा धोका वाढतो. मद्यप्राशन करून वाहन चालविणे हे केवळ कायद्याचे उल्लंघन नसून स्वतःसह इतर रस्ता वापरकर्त्यांच्या जीवितालाही धोका निर्माण करणारे आहे. मद्यप्राशन करुन वाहन चालवू नये.



## शेवटच्या श्रावण सोमवारनिमित्त चतुर्मुख महादेवाचे भाविक भक्तांनी घेतले दर्शन

■ पुरंदर (दै. संध्या)

भिवरी (ता. पुरंदर) गावानजीक असलेल्या दक्षिण काशी म्हणून प्रसिद्ध असलेल्या पुरातन देवस्थान चतुर्मुख शंभू महादेवाचे शेवटच्या श्रावणी सोमवारनिमित्त हजारो भाविक भक्तांनी शंभू महादेवाचे दर्शन घेतले.

भिवरी येथील श्री भैरवनाथ देवाची मानाची पालखी भैरवनाथ सेवा मंडळांच्या भाविक भक्तांनी पारंपरिक पद्धतीने वाजत गाजत चतुर्मुख महादेव मंदिर परिसरात नेली.आरतीनंतर पालखी विसावा कार्यक्रम झाला.

पुरंदर, भोर,हवेली या तीन तालुक्यांच्या सीमेनजीक असलेले चतुर्मुख शंभू महादेवाचे पुरातन मंदिर आहे. हे प्राचीन धार्मिक स्थळ दक्षिण काशी म्हणून प्रसिद्ध आहे.ऐतिहासिक क-हा नदी व क-हेची उपनदी चरणावतीचा उगम येथूनच होतो. महाराष्ट्राच्या विविध ठिकाणावरून भाविक भक्त येथील देवस्थान महात्म्यामुळे दर्शनासाठी येत असतात. श्रावणी सोमवारनिमित्त पहाटे भाविकांच्या उपस्थितीत शंभू महादेवाचे धार्मिक विधी संपन्न झाले. भिवरी, गराडे, बोपगाव, चांबळी, दरेवाडी, वारवडी, थापेवाडी, मठवाडी, रावडेवाडी, गोगलवाडी, पठारवाडी, वेळू, शिवापूर, आस्करवाडी येथील भाविक भक्तांनी शंभू महादेवाच्या दर्शनाचा लाभ घेतला.

## भगवान वीर गोगादेव जन्मोत्सव मिरवणुकीमध्ये राष्ट्रीय सफाई कर्मचारी आयोगाचे उपाध्यक्ष हरदीप सिंग गिल यांच्या हस्ते गुलाब पुष्प देऊन स्वागत

■ पुणे : (दै. संध्या)

मेहत्तर वाल्मिकी समाजाच्या वतीने भगवान श्री वीर गोगादेव जन्मोत्सव सोहळा भव्य बागड मिरवणूक दरवर्षीप्रमाणे यावर्षी अतिशय उत्साहात साजरी करण्यात आली पुणे कॅम्प येथील पुलगेट पोलीस चौकी समोरील भगवान श्री जहारवीर गोगादेव मंदिरामध्ये विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते मंदिराला विद्युत रोषणाई करण्यात आली होती पुणे कॅम्प परिसरातून विविध भागातून भगत आखाडाचे भगत हे निशान घेऊन मिरवणुकी मध्ये सामील झाले होते निशाणाला विविध लाइटिंग ची सजावट करण्यात आली होती सर्व निशाण आखाड्याला श्रीफळ, शाल देऊन व फुलांची माळ टाकून राष्ट्रीय सफाई कर्मचारी आयोग चे उपाध्यक्ष- मा.हरदीप सिंग गिल साहेब भारत सरकार (कॅबिनेट दर्जा )यांच्या हस्ते स्वागत करण्यात आले यावेळी मा. गिल साहेब यांना दगडूशेठ गणपतीची मूर्ती देऊन सन्मानित करण्यात आले सदर कार्यक्रम प्रमुख उपस्थिती मा.




रवीभाई परदेशीं अध्यक्ष -मेहत्तर वाल्मिकी महासंघ,महा. राज्य, मा.विनोद निनारिया, -मा.नगरसेवक पुणे मनपा, डॉ, दिपक निनारिया- सदस्य सन्मवय पुणे मनपा, मा.बाप्पू भोसले -दलित पँथर,बिडलान नगरसेवक पि चि., सतिशभाऊ लालबिगे, -संस्थापक अध्यक्ष अखिल भारतीय सफाई मजूर कॉंग्रेस 47 61 मा.ज्ञानेश्वर माने, रवी बेंगळे, सूर्यकांत यादव, अनिल भिंगारदिवे आदी उपस्थिती होते

## पांडुरंग तुळवे यांचा आदर्श घ्या : रवींद्र भवार

■ चाकण : (दै. संध्या)

सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक व आध्यात्मिक क्षेत्रात आपल्या कार्यकर्तुत्वाने समाजात वेगळा ठसा उमटवणारे खेड तालुक्यातील खालुंब्रे येथील फायनल सम्राट व प्रसिद्ध गाडा मालक पांडुरंग तुळवे यांच्या निधनाबद्दल तीव्र दुःख व्यक्त करून समाजाने पांडुरंग तुळवे यांचा आदर्श घ्यावा, असे गौरव उदगार बौद्धाचार्य रवींद्र भवार यांनी येथे काढले.



खालुंब्रे येथे आयोजित करण्यात आलेल्या श्रद्धांजली सभेत भवार बोलत होते. याप्रसंगी जिल्हा परिषदेचे सदस्य गणेश बोत्रे, खेड पंचायत समितीचे माजी उपसभापती अमोल पवार, पोलीस पाटील वंदना तुळवे, खालुंब्रे गावच्या माजी सरपंच कमल तुळवे, ॲड. विशाल तुळवे, माजी उपसरपंच विकास तुळवे, सामाजिक कार्यकर्ते संतोष तुळवे, उद्योजक चंद्रकांत तुळवे, संदीप बोत्रे, प्रशांत तुळवे, माणिक तुळवे आदींसह विविध क्षेत्रातील प्रतिष्ठित मान्यवर, ग्रामस्थ व तरुण कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. पांडुरंग तुळवे यांच्या कुटुंबाने सामाजिक बांधिलकी जपली, असे सांगून भवार म्हणाले," प्रयत्न, जिद्द, चिकाटी, प्रचंड आत्मविश्वास आणि कष्ट करण्याची तयारी यामुळे तुळवे हे बैलगाडा शर्यतीच्या घाटात फायनल सम्राट ठरले. तुळवे यांचा परिसरात मोठा दबदबा असल्याने त्यांचा सहवास अनेकांना बरेच काही शिकवून गेला. आधी केले मग सांगितले हे ब्रीद सत्यात उतरवणारे तुळवे यांनी शर्यतीच्या माध्यमातून माणसे जोडण्याची कामे केली. त्यांचा आदर्श आजच्या युवा पिढीला चालना व प्रेरणा देणारा एक चालता बोलता इतिहास आहे. वंदनाताई तुळवे या गावच्या पोलीस पाटील असल्याने आणि विकास भाऊ तुळवे यांनी उपसरपंच पदाची धुरा सांभाळली असल्याने पांडुरंग तुळवे यांना आपल्या कुटुंबाबद्दल मोठा अभिमान आणि प्रचंड आदर वाटत होता."

## संपूर्ण मालमत्ता कर तातडीने भरल्यास करात मिळणार एक टक्का सूट : डॉ. अंकुश जाधव

■ चाकण(दै. संध्या)

चाकण शहरातील नागरिकांसाठी सुवर्णसंधी चालून आली असून, येत्या ३० सप्टेंबरपूर्वी संपूर्ण मालमत्ता कर तातडीने भरल्यास करात एक टक्का सूट मिळणार असल्याची माहिती चाकण नगर परिषदेचे मुख्याधिकारी डॉ.अंकुश जाधव व नगराध्यक्षा मनीषा गोरे यांनी दिली.

चाकण नगरपरिषद हद्दीतील सर्व मालमत्ता धारकांना याबाबत आवाहन करण्यात आले आहे. आर्थिक वर्ष २०२६-२७ च्या मालमत्ता कर बिलांचे घरोघरी वाटप सुरू करण्यात आले आहे. शहराच्या विकासात आपले योगदान देण्यासाठी नागरिकांनी आपला मालमत्ता कर वेळेत भरणे गरजेचे आहे. नागरिकांना कर भरणा करणे सुलभ व्हावे आणि प्रामाणिक करदात्यांना प्रोत्साहन मिळावे, यासाठी चाकण नगरपरिषदेने विशेष सवलत योजना जाहीर केली आहे. थेट मालमत्ता करात एक टक्का सूट देण्यात आली आहे. मालमत्ता धारक त्यांच्या चालू आर्थिक वर्षाच्या मालमत्ता कराची संपूर्ण रक्कम ३० सप्टेंबर २०२६ पूर्वी जमा करतील, त्यांना एकूण मालमत्ता कर रक्कमेमध्ये एक टक्का सूट देण्यात येणार आहे. कर बिलांचे प्रत्यक्ष वाटप कर्मचाऱ्यांमार्फत सुरू करण्यात आले आहे.

ज्या नागरिकांना अद्याप बिल मिळाले नसेल, त्यांनी नगरपरिषदेच्या कर संकलन विभागाशी संपर्क साधण्याचे आवाहन डॉ. अंकुश जाधव यांनी केले आहे. नागरिक नगरपरिषदेच्या अधिकृत संकेतस्थळावरून किंवा बिलावरील क्यू आर कोड स्कॅन करून यूपीआय ॲप द्वारे घरबसल्या सुरक्षितपणे कर भरणे सुलभ होईल. यावेळी कर अधिकारी सुनील गोरडे, सहाय्यक कर निरीक्षक नेहा कुलकर्णी, वरिष्ठ कर कर्मचारी सुरेखा गोरे आदी उपस्थित होते." चाकण शहराचा कायापालट करण्यासाठी आणि रस्ते, पाणी, स्वच्छता, पथदिवे यांसारख्या मूलभूत सुविधा अधिक सक्षम करण्यासाठी नागरिकांचा कर रुपी निधी महत्त्वाचा आहे.

## अधिकमासामुळे यंदा गणपती बाप्पाचे उशिरा आगमन

■ कान्हाटी (दै. संध्या)

हिंदू धर्मात प्रत्येक महिन्याचे महत्त्व आहे. श्रावण या पवित्र महिन्यानंतर भाद्रपद महिन्यात चौथ्या दिवसापासून गणपती उत्सवाला प्रारंभ होतो. एका आठवड्यावर येऊन ठेपलेल्या गणपती उत्सवाची मात्र आतापासूनच लगबग सुरू असून मागील वर्षीच्या तुलनेत यावर्षी अधिकमास महिना वाढल्यामुळे यंदा १९ दिवस उशिरा गणपती बाप्पाचे आगमन होणार असले तरी गणपती मंडळे, बँडपथक, ढोल ताशे बुकिंग, सजावटीसाठी सरसावले असून मूर्तिकारही बाप्पांच्या मूर्तींवर शेवटचा हात फिरवत आहे.

गणेश चतुर्थी हा सण दरवर्षी भाद्रपद महिन्यातील शुक्ल पक्षाच्या चतुर्थी तिथीला साजरा केला जातो. त्यानुसार गणपती उत्सवाला १४ सप्टेंबर (सोमवार) पासून सुरुवात होणार असली तरी गेल्या वर्षाच्या तुलनेत यावर्षी गणपती बाप्पा १९ दिवस उशिरा विराजमान होतील. या दिवशी गणेशाची पूजा केली जाईल, तर गौरी-गणपती विराजमान हे १४ सप्टेंबर २०२६ रोजी होणार. तर गणपती विसर्जन (अनंत चतुर्दशी) २५ सप्टेंबर २०२६ रोजी होणार



आहे. म्हणजेच १४ सप्टेंबर ते २५ सप्टेंबर २०२६ दम्यान गणेशोत्सव साजरा जाणार आहे. त्यानंतर १२ व्या दिवशी गणपती बाप्पाचे विसर्जन होणार आहे.

यावर्षी बाप्पांची मूर्ती बनविण्याची लगबग अंतिम टप्यात असून त्यामुळे मूर्ती कारागिरांनाही अधिक वेळ मिळाला आहे. मागील वर्षी २७ ऑगस्टला गणेश उत्सवाला सुरुवात झाली होती तर ६ सप्टेंबाला अनंत चतुर्दशी होती. यावर्षी मात्र बारा दिवस गणरायाचा मुक्काम राहणार असून मागील वर्षीच्या तुलनेत यावर्षी बाप्पाचे १९ दिवस उशिरा आगमन होणार असले तरी आतापासूनच मूर्तिकार, गणपती मंडळे तयारीला लागले असून मूर्तीची बुकिंग होऊन पोहोच केली जात आहे. बाहेरील राज्यातील मूर्तिकार मूर्ती बनविण्यासाठी महाराष्ट्रात आल्याने स्थानिक कारागिरांना त्याचा फटका बसत आहे. गणेश चतुर्थी हा गणपतीचा जन्मदिवस म्हणून साजरा केला जातो. गणेश चतुर्थीच्या दिवशी श्रीगणेशाची पूजा केल्याने भक्ताला बुद्धी, समृद्धी व सौभाग्य प्राप्त होते, असे मानले जाते. गणेश चतुर्थीच्या दिवसापासून गणेशोत्सव सुरू होतो. हा उत्सव १०,१२ दिवस चालतो. या उत्सवात गणेशाची विधिवत पूजा केल्यास शुभ फल प्राप्त होते. देशभरामध्ये गणेश उत्सव मोठ्या उत्साहात साजत केला जातो, पण महाराष्ट्रात गणेशोत्सवाचा एक वेगळाच उत्साह पहायला मिळतो. यात काही दिवसातच गणेश मंडळात सजावटीचे लगबग सुरू झाली आहे. गणेशभक्त गणेशोत्सव काळात गणपती बाप्पाची आरती, भजन, कीर्तनात दंगून जाण्यास सज्ज झाले आहेत. गणेशाची भक्तीभावाने पूजा करण्यास उत्सुक आहेत.

## पंढरपूर ते घुमाण सायकल वारीत सहभागी व्हा : सुर्यकांत भिसे

■ पुरंदर (दै. संध्या)

संत शिरोमणी श्री नामदेव महाराज जयंती निमित्त श्री क्षेत्र पंढरपूर ( महाराष्ट्र ) ते श्री क्षेत्र घुमाण (पंजाब) या सुमारे २५०० किलोमीटर रथयात्रा व सायकल वारीत भाविकांनी सहभागी व्हावे असे आवाहन भागवत धर्म प्रसारक मंडळाचे राष्ट्रीय अध्यक्ष सुर्यकांत भिसे यांनी केले आहे.

भागवत धर्म प्रसारक मंडळ, पालखी सोहळा पत्रकार संघ, श्री नामदेव दरबार कमेटी घुमाण व समस्त नामदेव शिंपी समाजाच्या वतीने दरवर्षी कार्तिक शुद्ध एकादशी ते मार्गशीर्ष शुद्ध द्वादशी अशी सुमारे एक महिन्याची संत शिरोमणी श्री नामदेव महाराज रथयात्रा व सायकल वारी काढण्यात येते. वारीचे हे पाचवे वर्ष आहे. यंदा २१ नोव्हेंबर ते २१ डिसेंबर २०२६ अशी रथयात्रा व सायकल वारी आयोजित करण्यात आली आहे. महाराष्ट्र, गुजरात,




राजस्थान, हरियाणा, पंजाब, दिल्ली, उत्तर प्रदेश व मध्य प्रदेश अशा आठ राज्यातील सुमारे ५० मोठया शहरांतून व ५०० पेक्षा अधिक ग्रामीण खेड्यातून ही अध्यात्मिक, ऐतिहासिक, सांस्कृतिक व निसर्गरम्य परिसराचे दर्शन घडविणारी सायकल वारी काढली जाते. या सायकल वारीच्या माध्यमातून शांती, समता, बंधुता या संत विचारांचा प्रचार व प्रसार केला जातो. तसेच पर्यावरणाचा संदेश दिला जातो . या सायकल वारी मध्ये सहभागी होण्यासाठी कोणतेही प्रवेश शुल्क आकारले जात नाही. सायकल यात्रींना दोन टी शर्ट, दररोज चहा, नास्ता, भोजन व निवास व्यवस्था मोफत पुरविण्यात येते. अधिक माहितीसाठी भागवत धर्म प्रसारक मंडळ, सुमित्रा प्लाझा, वेळापूर ता माळशिरस जि सोलापूर मो. ९८२२०२३५६४ या कार्यालयाशी ३० सप्टेंबर पूर्वी संपर्क साधावा व नाव नोंदणी करावी असे आवाहन भिसे यांनी केले आहे.